
घरचा स्वाद, घरची शुध्दता... शुद्ध खा.. स्वस्थ रहा
नवल ® शुध्द घी
म्हशीचे व गायीचे साजुक तुप
मे. नवलमल दौलतराम, बॉम्बेलॉज खाली, आग्रा रोड,धुळे
फोन : (02562) 238661 email : navalgheedhule@gmail.com

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००
संस्थापक - लोकमित्र भाई मदाने
WWW.APLAMAHARASHTRA.IN
POST REGD.No./DHL/53/24-26
संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२४५ ■ सोमवार ८ जुन २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

## विश्वगुरू नागरिकांचे संरक्षण करू शकत नाहीत
## एलपीजी दरवाढीवर विरोधकांची सरकारवर टीका

**नवी दिल्ली, दि. ७ : घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ केल्यामुळे विरोधी पक्षांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. आधीच महागाईचा सामना करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक बोजा टाकल्याचा आरोप काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, आम आदमी पक्ष आणि तृणमूल काँग्रेसने सरकारवर केला आहे. ही दरवाढ गेल्या तीन महिन्यांतील दुसरी वाढ असून, मार्च महिन्यातही घरगुती एलपी-जी सिलिंडरच्या किमतीत साठ रुपयांची वाढ करण्यात आली होती. मध्यपूर्वेतील संघर्षामुळे जागतिक ऊर्जा बाजारात निर्माण झालेल्या अस्थिरतेचा परिणाम इंधनाच्या दरांवर होत असल्याचे केंद्र सरकारकडून सांगितले जात आहे.**



महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असताना केंद्र सरकारने घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या किमतीत पुन्हा २९ रूपयांची वाढ केली आहे. या दरवाढीनंतर दिल्लीतील १४.२ किलोच्या घरगुती सिलिंडरची किंमत ९१३ वरून ९४२ रुपये झाली आहे. ही दरवाढ गेल्या तीन महिन्यांतील दुसरी वाढ असून, मार्च महिन्यातही घरगुती एलप-ीजी सिलिंडरच्या किमतीत साठ रुपयांची वाढ करण्यात आली होती. मध्यपूर्वेतील संघर्षामुळे जागतिक ऊर्जा बाजारात निर्माण झालेल्या अस्थिरतेचा परिणाम इंधनाच्या दरांवर होत असल्याचे केंद्र सरकारकडून सांगितले जात आहे.

**महागाई पुरुष मोदी : काँग्रेस**

दरवाढीनंतर काँग्रेसने पुन्हा एकदा महागाई पुरुष मोदी म्हणत सरकारवर टीका केली. पक्षाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील पोस्टमध्ये लिहिले आहे की, महागाई पुरुष मोदी यांनी पुन्हा एकदा महागाईचा बडगा उगारला आहे. आता घरगुती गॅस सिलिंडर २९ रुपयांनी महाग झाला आहे. मोदींचे सूत्र स्पष्ट आहे, जनतेकडून पैसे उकळायचे आणि आपल्या (पान ४ वर)

## कॉम्पॅक्टचे पितळ उघडे सरकारचा पराभव : गांधी

नवी दिल्ली, दि. ७ : अठरा वर्षीय सार्थक सिद्धांतने सीबीएसईच्या बारावीच्या ऑन-स्क्रीन मार्किंग प्रणाली आणि या प्रणालीसाठी जबाबदार असलेल्या कॉम्पॅक्ट कंपनीच्या निविदा प्रक्रियेतील अनियमितता उघड केली आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी तोच प्रतिभावान सीबीएसईचा विद्यार्थी सार्थक सिद्धांतसोबतच्या भेटीचा सव्वाआठ मिनिटांचा व्हिडिओ शेअर केला. या दोघांची भेट दोन जून रोजी दिल्लीत झाली होती. तेव्हा तरुणांचा हा विजय म्हणजे सरकारचा खरा पराभव आहे, असे राहुल गांधी म्हणाले.

या संदर्भात काँग्रेस नेते राहुल गांधी म्हणाले, देशातील हा अठरा वर्षांचा तरुण सीबीआयपेक्षाही हुशार असल्याचे सिद्ध झाले. तरुणांचा हा विजय म्हणजे सरकारचा खरा पराभव आहे. झारखंडमधील रांचीचा रहिवासी असलेल्या (पान ४ वर)

## मुंबई विमानतळावर पाच कोटीचे सोने जप्त
## तस्करात भाजप पदाधिकारी असल्याचा आरोप

**मुंबई, दि. ७ : देशाची आर्थिक राजधानी असल्याने मुंबईत दररोज अब्जावधींची उलाढाल होत असते. त्यामध्ये अवैध व्यवसाय, तस्करी, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारीच्या घटना समोर येतात. डीआरआयच्या मुंबई विमानतळावरील कारवाईत सुमारे तीन किलो दोनशे ग्रॅम परदेशी सोन्याची धूळ (वॅक्स स्वरूपात) जप्त करण्यात आली आहे. त्याची किंमत अंदाजे ५ कोटी रुपये आहे. या प्रकरणात तीन बांगलादेशी आणि श्रीलंकन नागरिक, तीन विमानतळ कर्मचारी आणि एक रिसिव्हर, अशा एकूण सात जणांना अटक करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणी भाजप पदाधिकाऱ्याला मुंबई विमानतळावर अटक करण्यात आली आहे. यावर भाजप आता काय सांगणार, असा प्रश्न शिवसेना ठाकरे गटाचे नेते, खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे.**

सोने तस्करीचे मुंबई विमानतळ पोलीस अधिकाऱ्यांपुढे मोठे आव्हान असते. मात्र, मुंबईतील संचालनालय महसूल गुप्तचर विभागाकडून सातत्याने मुंबई विमानतळावरुन होणारी तस्करी रोखण्यात आल्याचे आपण पाहिले आहे. आता, ऑपरेशन गोल्डन नेक्सस अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर डीआरआयने सोन्याच्या तस्करीच्या रॅकेटचा पर्दाफाश केला. डीआरआयच्या मुंबई विमानतळावरील कारवाईत सुमारे ३.२ किलो परदेशी सोन्याची धूळ (वॅक्स स्वरूपात) जप्त करण्यात आली असून त्याची किंमत अंदाजे ५ कोटी रुपये आहे. या प्रकरणात तीन बांगलादेशी व श्रीलंकन नागरिक, ३ विमानतळ कर्मचारी आणि एक रिसिव्हर अशा एकूण ७ जणांना अटक करण्यात आली आहे.

डीआरआयच्या माहितीनुसार, बँकॉकहून मुंबईमार्गे प्रवास करणारे परदेशी नागरिक शरीरात सोने लपवून आणत होते. विमानतळावरील काही कर्मचारी हे सोने बाहेर काढून स्थानिक एजंटांकडे पोहोचवत होते. कारवाई दरम्यान दोन बस चालक आणि एका कोच मॉनिटरला सोन्याची डिलिव्हरी करताना पकडण्यात आले. दरम्यान, कस्टम्स कायदा, १९६२ अंतर्गत सोने जप्तीची कारवाई करण्यात आली असून तस्करी करणारी साखळी उद्ध्वस्त करण्यात डीआरआयला यश आले आहे. याप्रकरणी, अधिक तपास सुरू असून हे सोने नेमके कुठे जाणार होते, कुठून आले होते, याबाबत सखोल चौकशी सुरू आहे. (पान ४ वर)

## शहीद शिरीषकुमारच्या जन्मशताब्दीचा प्रशासनाला विसर : मंत्र्यांना निवेदन

**नंदुरबार,दि.७ (प्रतिनिधी) - स्वातंत्र्य लढ्यापूर्वी ९ सप्टेंबर १९४२ रोजी शहीद शिरीषकुमार यांच्यासह नंदुरबारच्या पाच बालवीरांनी बलिदानाची आहुती दिली. त्यातील प्रमुख नंदुरबारचे शहीद शिरीषकुमार मेहता यांचे २०२६ वर्ष जन्मशताब्दी वर्ष आहे. या महत्त्वपूर्ण विषयाचा स्थानिक स्वराज्य संस्था आणि प्रशासनाला विसर पडला आहे. याबाबत कुठलेही नियोजन नसल्यामुळे प्रशासनाला स्मरणपत्र म्हणून शहीद शिरीषकुमार मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष महादू**



**हिरणवाळे यांनी पालकमंत्री ना. हसन मुश्रीफ यांना निवेदन दिले आहे. या निवेदनाच्या प्रती राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांना देखील पाठविण्यात आले आहे.**

या निवेदनात म्हटले आहे की, ज्या शहिदांनी बलिदान देऊन नंदुरबारचे नाव हिंदुस्थानात अजरामर केले. त्या हुतात्मा शिरीषकुमार मेहता यांच्या जन्मशताब्दी वर्षात जिल्हा प्रशासनाला शहिदांच्या कार्याचा विसर पडला आहे. नंदुरबार शहरातील सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात विविध जनजागृती आणि प्रबोधनपर उपक्रम व्हावे यासाठी जिल्हा नियोजन मंडळात तरतूद करण्यात यावी.

दि. २८ डिसेंबर २०२६ रोजी शहीद शिरीषकुमार मेहता यांची १०० वी (पान ४ वर)

## शिरपूरच्या तरुणाची तापीत आत्महत्या

धुळे, दि.७ - शिरपूर येथील एका तरुणाने तापी नदीत उडी मारून आत्महत्या केली. सावळदे शिवारात नदीकाठी मृतदेह आढळल्यानंतर घटना उघडकीस आली.

अनिरुद्ध रवींद्र पाटील (वय २६, रा. जैन मंदिराजवळ शिरपूर) असे त्याचे नाव आहे. त्याने तापी नदीत उडी मारून आत्महत्या केली. मृतदेह तरंगत असल्याचे काहींच्या निदर्शनास आले. कुटुंबीयांसह परिसरातील काहींनी घटनास्थळी धाव घेतली. अनिरुद्धला ग्रामीण रुग्णालय शिरपूर येथे दाखल केले. डॉ. शितल शिंदे यांनी तपासुन मृत घोषित केले. नातेवाईक सुनील पाटील (पान २ वर)

## टीईटी निर्णय, शिक्षकांमध्ये असंतोष
## पूर्वनियुक्त शिक्षकांवर टीईटीची सक्ती कोणत्या आधारावर? महेश मुळे

**धुळे, दि.७ - टीईटी संदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अलीकडील निर्णयामुळे देशभरातील लाखो शिक्षकांमध्ये संभ्रम, चिंता आणि असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर कायदेशीर, प्रशासकीय आणि शैक्षणिक बाबींचा सखोल पुनर्विचार होणे आवश्यक असल्याचे मत भाजपा शिक्षक आघाडीचे महेश मुळे यांनी व्यक्त केले आहे.**

महेश मुळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील कलम २३ नुसार शिक्षकांसाठी किमान पात्रता निश्चित करण्याचा अधिकार राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेला देण्यात आला आहे. त्यानुसार २३ ऑगस्ट २०१० रोजी जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेतील कलम मध्ये आरटीई लागू होण्यापूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांसाठी टीईटीची अट लागू नसल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते.

सदर तरतूद आजपर्यंत रद्द झालेली नाही, त्यात कोणतीही सुधारणा झालेली नाही आणि कोणत्याही सक्षम न्यायालयाने ती अवैध ठरविलेली नाही. मग पूर्वनियुक्त शिक्षकांवर टीईटीची सक्ती कोणत्या वैधानिक आधारावर केली जात आहे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

**प्रशासकीय भूमिकेवरही प्रश्नचिन्ह**

मुळे यांनी पुढे नमूद केले की, जर सर्व शिक्षकांसाठी टीईटी अनिवार्य करण्याचाच मूळ उद्देश असता, तर केंद्र व राज्य सरकारे, शिक्षण विभाग, एनसीटीई आणि इतर धोरणकर्त्यांनी त्याबाबत स्पष्ट भूमिका पूर्वी का घेतली नाही? अनेक वर्षांच्या शासन आदेशांमध्ये आणि परिपत्रकांमध्ये पूर्वनियुक्त (पान २ वर)

## जागतिक पर्यावरणदिन ओमनगरात हरित संकल्प

शिरपूर, दि.७ (प्रतिनिधी) - जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ओम नगर मांडळ शिवार, शिरपूर यांच्या वतीने ओम नगर येथील ओपन स्पेसच्या परिसरात वृक्षारोपणाचा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संरक्षण, संवर्धन आणि हरित भविष्यासाठी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात स्थानिक नागरिक, युवक, महिला व स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी कडुनिंब, पिंपळ, आंबा, जांभूळ, करंज, अशोक, गुलमोहर आदी देशी व औषधी वृक्षांची लागवड करण्यात आली. एक झाड एक (पान २ वर)

## धुळ्यातील तीन उद्योनमुख क्रिकेटपटूंचा महाराष्ट्राच्या संभाव्य संघाकरीता निवड



**शिरपूर / धुळे, दि.७ (प्रतिनिधी) - धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे १६ वर्षाखालील प्रतिभावंत व उदयोनमुख क्रिकेटपटू पनव अग्रवाल, देवेन वाघ व सोहम चौधरी यांची संभाव्य महाराष्ट्र संघात निवड करण्यात आली आहे.**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित १६ वर्षाखालील आमंत्रित क्रिकेट स्पर्धेत या तिन्ही क्रिकेटपटूंनी शानदार कामगिरी केल्याने धुळे जिल्हा संघ तब्बल ८ वर्षानंतर सुपर लिग फेरी साठी पात्र ठरला होता.

पनव अग्रवाल याने बहारदार फलंदाजी करीत ९ सामन्यात २ शतक व २ अर्ध शतकांच्या मदतीने तब्बल ६३१ धावा करून महाराष्ट्रात पहिल्या १० फलदांजामध्ये स्थान पटकाविण्याची किमया साधली. त्याची नाबाद १४९ धावांची खेळी सर्वोत्तम ठरली. कर्णधार देवेन वाघ याने ९ सामन्यात आपल्या फिरकीच्या जादूने ३४ गडी गारद केले. त्याने एका डावात तब्बल ८ गडी बाद करण्याची ऐतिहासिक कामगिरी केली. तर सोहम चौधरी याने धडाकेबाज फलंदाजी व गोलंदाजीचे प्रदर्शन करीत २४५ धावा व १३ गडी बाद करून अष्टपैलू कामगिरी केली. त्याने मारलेले २० षटकार या स्पर्धेचे मुख्य आकर्षण ठरले. त्यासोबतच त्याची निव्वळ २७ चेंडूतील ७२ धावांची वेगवान वादळी खेळी संस्मरणीय ठरली.

पनव अग्रवाल हा शिरपूर तालुका क्रिकेट (पान ४ वर)



## रेल्वे अंडरपास लवकर पुर्ण करा आ.चंद्रकांत रघुवंशी यांचे निर्देश

नंदुरबार, दि.७ (प्रतिनिधी) - शहरातील नळवा रस्त्यावरील रेल्वे अंडरपासमध्ये पावसाळ्यात साचणाऱ्या पाण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी रेल्वे विभागाकडून सुरू असलेल्या ड्रेनेज कामाची आ.चंद्रकांत रघुवंशी यांनी पाहणी केली. पावसाळ्यापूर्वी हे काम दर्जेदार व वेळेत पूर्ण करून नागरिकांना दिलासा द्यावा अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. बोगद्यात साचणाऱ्या पाण्याचा निचरा करण्यासाठी २ ठिकाणी खुल्या ड्रेनेज लाईन कार्यान्वित करण्यात येत आहे.

नळवा रस्त्यावरील रेल्वे बोगद्यात दरवर्षी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाणी साचत असल्याने वाहतूक वारंवार विस्कळीत होत होती. त्यामुळे रेल्वे पट्ट्यालगतच्या परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या समस्येच्या कायमस्वरूपी निराकरणासाठी शिवसेना नेते तथा आ.चंद्रकांत रघुवंशी व नगराध्यक्षा रतका रघुवंशी यांनी रेल्वे विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.

या पाठपुराव्यानंतर रेल्वे विभागाने मेपासून (पान २ वर)

## बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र-गोवाच्या सदस्यपदी ज्ञानेश्वर बागुलांचा विजय

**धुळे, दि.७ - बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा च्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणूकीची मतमोजणी प्रक्रिया नुकतीच पार पडली. त्यात शिरपूर येथील मूळ रहिवासी आणि सभाजीनगर येथील उच्च न्यायालयात प्रॅक्टिस करणारे ॲड. ज्ञानेश्वर बागुल यांनी विजय मिळवला आहे.**



अंत्यत चुरशीच्या झालेल्या बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा च्या निवडणूकित धुळे जिल्ह्याचे सुपुत्र तथा धुळे बारचे सदस्य असलेले आणि गेल्या २६ वर्षा पासून मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजी नगर खंडपीठात वकिली करत असलेले ॲड. ज्ञानेश्वर बागुल यांनी विजय मिळवला आहे.

एकल संक्रमन पद्धतीने पार पडलेल्या या निवडणुकीत ॲड. बागुल यांना संपुर्ण महाराष्ट्र राज्यासह कार्यक्षेत्रात असलेल्या प्रत्यक बार मधून प्रथम पसंतीचे मत मिळाले आहेत. त्यांना धुळे जिल्ह्यातील धुळे, शिरपूर, शिंदखेडा, दोंडाईचा, साक्री सह लगतच्या जळगाव,(पान २ वर)

## चितोडरोड परिसरात दांपत्याची लुटमार

धुळे, दि.७ - येथील चितोड रोड परिसरातील रंगारी चाळीत दांपत्यास मारहाण करीत त्यांच्याकडील सोन्याची चैन अठरा हजारांची रोकड तिघांनी लुटून नेली. याप्रकरणी तिघांविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. गोरख वसंत झिंबल (वय ३८, रा. श्रीकृष्ण कॉलनी चितोड रोड) याच्याशी शुक्रवारी (ता.५ ) मध्यरात्री नंतर चितोड रोड रंगारी चाळ परिसरात काहींनी वाद घातला. त्याच्यासह सोबत असलेल्या महिलेस शिवीगाळ केली, मारहाण गोरखच्या खिशातील अठरा हजारांची रोकड, (पान ४ वर)

## उबाठाच्या युवासेनाप्रमुख पाटलांच्या मार्गदर्शनात सडेतोड वक्तव स्पर्धा



**नंदुरबार,दि.७ (प्रतिनिधी) - महाराष्ट्रातील तरुणांच्या विचारांना प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी व बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्म शताब्दी वर्षा निमित्त शिवसेना नेते तथा युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या आदेशाने व शिवसेना तथा युवासेना सचिव वरुण सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाने युवासेनेच्या वतीने सडेतोड वक्तृत्व स्पर्धे २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा केवळ वक्तृत्वापुरती मर्यादित नसून महाराष्ट्रासाठी विचार करणाऱ्या, ठाम भूमिका मांडणाऱ्या आणि भविष्यातील नेतृत्व घडवणाऱ्या तरुणांचा शोध घेण्याचा उपक्रम असल्याचे आयोजकांनी सांगितले.**

सदर स्पर्धेत २० युवक-युवतीं नी सहभाग घेत व्हिजन महाराष्ट्र २०५० आणि राजकारण आणि समाजकारण : युवकांची भूमिका या दोन विषयांवर आपले विचार सादर केले.स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.तर अनुक्रमे एक ते तीन नंबर काढून त्यांना स्मृतिचिन्हे व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. युवा सेनेच्या वतीने युवा सेना जिल्हाप्रमुख सागर पाटील यांच्या मार्गदर्शना खाली स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धा तळोदा प्रवक्ता अकॅडमीचे संचालक समाधान पाटील व नंदुरबार प्रवक्ता अकॅडमी संचालक राकेश महिरे यांच्या सौजन्याने करण्यात आली. यावेळी बरेच विद्यार्थी विद्यार्थिनींनी स्पर्धेत भाग घेत (पान ४ वर)

## वणी येथील तिघांवर चाकूने जीवघेणा हल्ला

धुळे, दि.७ - वणी (ता. धुळे) येथील तरुणासह तिघांवर शिवीगाळ, दमदाटी करून चाकूने वार केला. याप्रकरणी तिघा संशयीतांवर धुळे तालुका पोलिसात गुन्हा दाखल झाला.

योगेश विजय वाघ (वय २६, रा. वणी) चोपडाई (ता. अमळनेर) येथून वणी गावाकडे मोटरसायकलने येत होते. नवलनगर बसस्टँडवर संशयितांनी शिवीगाळ केली. त्याची विचारणा केली, त्यावरून ठार मारण्याची धमकी देत चाकूने सपासप वार करुन गंभीर दुखापत केली. ठार मारण्याचा प्रयतक केला. मारहाणीत (पान ४ वर)

## पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण वनऔषधींच्या बियांचे प्रदर्शन




**शहादा, दि.०८(का.प्र.) - जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सामाजिक वनीकरण क्षेत्र शहादा यांच्या वतीने ग्रामपंचायत मोहिदे (ता. शहादा) येथे एक पेड़ माँ के नाम अभियानांतर्गत वृक्षारोपण आणि जंगलातील विविध वृक्षांच्या बियाण्यांची ओळख करून देणारा जनजागृती कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न झाला.**

या कार्यक्रमाला मोहिदे गावाचे सरपंच, सामाजिक कार्यकर्ते भाऊभाई भाईदास पाटील, प्रकाश गिरासे, अशोक पाटील, किसान विद्यालयाचे संचालक विनायक अलकरी (लेखापाल), तुंबाभाई पाटील, तसेच भाजपा सहकार आघाडीचे जिल्हाध्यक्ष के. डी. गिरासे यांच्यासह ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे जंगलातील विविध वृक्षांच्या बियाण्यांचे प्रदर्शन होते. वनरक्षक भूपेश तांबोळी यांनी उपस्थित नागरिक व विद्यार्थ्यांना एकूण १९ प्रजातींच्या वृक्षांच्या बियाण्यांची ओळख करून दिली. यामध्ये प्रामुख्याने सिसम, कांचन, आवळा, साग, (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,39,000 रु.+3% GST
सोने- 24 K -1,51,800 रु.+3% GST
चांदी- 2,50,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३


सेंद्रिय जांभुळ
संकेत नित्या फार्मचे उत्कृष्ट सेंद्रिय जांभुळ उपलब्ध
✻ संपर्क ✻
वेळ : सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत
दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग-धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६

## विवाह नोंदणी सेवा ऑनलाईन सुरु धुळे महापालिकेचा स्तुत्य उपक्रम सुरु

**धुळे, दि.७ - नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेळेची बचत करणाऱ्या सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने धुळे महानगरपालिकेने विवाह नोंदणी सेवा पूर्णतः ऑनलाईन स्वरूपात सुरू केली आहे. या नव्या उपक्रमामुळे नागरिकांना विवाह नोंदणीसाठी महानगरपालिका कार्यालयात वारंवार फेऱ्या मारण्याची गरज भासणार नसून घरबसल्या ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहे.**



महानगरपालिकेने विवाह नोंदणी प्रक्रियेतील अर्ज सादरीकरण, कागदपत्रांची पडताळणी, उपस्थितीबाबत सूचना तसेच प्रमाणपत्र वितरण या सर्व प्रक्रिया अधिक सुलभ, जलद आणि कार्यक्षम केल्या आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी ही सेवा धुळे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर, Dhule E-Connect App वर तसेच संकेतस्थळावरील चॅटबॉट सुविधेद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महत्त्वाचे म्हणजे, दि. ८ जून २०२६ पासून विवाह नोंदणीसाठी ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य राहणार असून ऑफलाईन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

विवाह नोंदणीसाठी अर्जदारांनी प्रथम ऑनलाईन अर्ज भरून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत. त्यानंतर अर्ज व कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल. पडताळणी पूर्ण झाल्यानंतर अर्जदारांना प्रत्यक्ष उपस्थितीसाठी दिनांक व वेळ कळविण्यात येईल. निर्धारित दिवशी आवश्यक मूळ कागदपत्रांसह (पान ४ वर)

## गणोरला जागतिक पर्यावरण दिन साजरा

शहादा, दि.७ (प्रतिनिधी) - जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ग्राम पंचायत गणोर व एन एम सदगुरु फाउंडेशन एच डी एफ सी परिवर्तन यांच्या संयुक्त विद्यमानाने पर्यावरण दिवस साजरा करण्यात आला.

यावेळी वृक्षारोपण करण्यात आले. हा दिवस केवळ एक उत्सव नसून पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी स्वीकारण्याची आठवण करून देणारा दिवस आहे. झाडे लावणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, पाणी वाचवणे, ऊर्जा बचत करणे आणि स्वच्छता राखणे यांसारख्या छोट्या कृतींमधूनही मोठा बदल घडू (पान ४ वर)

## पोलीस अधीक्षकांनी सुचना केल्यावर अश्लील हावभाव करणाऱ्यावर गुन्हा

**धुळे, दि.७ - येथील मोगलाई फुलेनगर परिसरात महिलांकडे पाहून अश्लील हावभाव करणाऱ्या तरुणाविरुध्द शहर पोलीसात गुन्हा दाखल झाला. चार ते पाच तासानंतरही पोलिसांनी कुठलीही दखल न घेतल्याने अखेर संतप्त महिलांनी पोलीस अधीक्षकांकडे मागणी केली. पोलीस अधीक्षकांच्या सुचनेनंतर तक्रारीची नोंद झाली.**

संतोष उर्फ भैय्या सहादु दामोदर असे संशयीताचे नाव असून परिसरातील महिलांकडे पाहून तो वारंवार अश्लील हावभाव करीत होता.

वारंवार घडणाऱ्या या प्रकारामुळे महिला आणि नागरिकांनी रोष व्यक्त केला. एका महिलेने संबंधित व्यक्तीचे अश्लील हावभाव मोबाईलमध्ये चित्रीकरण केले, महिला नागरिकांनी शहर पोलीस ठाणे गाठले. याप्रकरणी संबंधित महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार संतोष दामोदर, कल्पेश संतोष दामोदर, कलाबाई सहादु दामोदर, ज्योती युवराज पवार (सर्व रा.गल्ली क्रमांक सात, फुलेनगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. (पान ४ वर)

# आपला महाराष्ट्र

## स्थित प्रज्ञांना हवेत बंदुकीचे परवाने

शस्त्र-परवान्यावरून साधूं मध्ये आखाडा अशी एक बातमी राज्यस्तरावरील वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली आहे. नाशिकचा कुंभमेळा तसा सुरुवातीपासूनच वादग्रस्त बनला आहे. साधू ग्राम साठी जे जंगल तोडले जात होते त्याबद्दल नाशिककर पर्यावरण प्रेमींनी आंदोलन केले. ते आंदोलन सुंदरलाल बहुगुणा यांच्या आंदोलनाप्रमाणे चिपको आंदोलन होते. परंतु आंदोलकांना हरित लवादाकडे सुद्धा जावे लागले. हरित लवादाने वृक्षतोडीला स्थगिती दिली. आजही हा प्रश्न प्रलंबित असला तरी अनेक झाडे तोडण्यात आले आहेत. कुंभमेळा मंत्री आणि सरकार झाडे तोडण्याबाबत ठाम आहेत. त्यामुळे पर्यावरण प्रेमी आणि सरकार यांच्यात मोठी लढाई किंवा संघर्ष सुरू झालेला आपल्याला दिसेल. हे सर्व ज्या साधूंसाठी आहे त्यांच्या आखाड्यांच्या एकाही प्रमुखांनी झाडे तोडू नका. आम्ही झाडांच्या मध्ये देखील राहू शकतो. आमच्या निवासाची तेवढी काळजी नको असे म्हटलेले नाही. उलट त्यांच्यासाठी जी आलिशान व्यवस्था करण्यात येणार आहे त्याची ते वाट बघत आहेत असे लक्षात येते. जर तशी व्यवस्था केली नाही तर सरकारवर ही मंडळी कोपेल आणि सरकारला शाप देईल अशी भीती सरकारला आणि सरकारचे प्रतिनिधी कुंभमेळा मंत्री यांना वाटत असावी. त्यामुळे ते अधिक काळजी घेत आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सरकारने आता साधू ग्रामवर काही हजार कोटी रुपयांची तरतूद करून तो निधी इतरत्र खर्च करू नये असे आदेश पारित केलेले आहेत. जर संबंधित अधिकाऱ्यांनी तो निधी इतरत्र वापरला तर त्याच्याविरुद्ध कारवाई करण्यात येईल असेही या आदेशात म्हटलेले आहे. हा झाला प्रशासकीय भाग. त्यामुळे कुंभमेळा आणि त्याची व्यवस्था ही सरकारची जबाबदारी सरकार पार पाडणारच आहे हे स्पष्ट झाले. मात्र त्याच बरोबर आणखी एक भानगड उपस्थित झाली आणि ती म्हणजे कुंभ नगरीतील महंतांना बंदुकीचा परवाना गरजेचा वाटतो. आखाड्याची संपत्ती आणि स्वसंरक्षणासाठी त्यांना बंदूक हवी. त्याचबरोबर दुसऱ्या एका आखाड्याच्या महंतानी या परवान्यांना विरोध केलेला आहे.

कुंभमेळ्यात प्रत्येक आखाड्यात पोलीस चौकी स्थापन झालेली असते. प्रमुख महंताना शस्त्रधारी बंदोबस्त दिला जातो. असे असताना महंताना महाराष्ट्रात शस्त्र परवान्याची गरज काय असा त्यांनी प्रश्न केलेला आहे. ज्यांना प्रशासनाने बंदुकीचे परवाने दिले ते ताबडतोब रद्द करावे अशीही मागणी दुसऱ्या आखाड्याचे महंत यांनी केलेली आहे. तर ज्यांनी बंदुकीचे परवाने मागितले त्यांचे समर्थन करणाऱ्या काळाराम मंदिराच्या विश्वस्तांनी महाराष्ट्रात बंदोबस्त असतो परंतु साधू महंत बाहेर भ्रमंती करतात, तेव्हा शस्त्र बाळगणे आवश्यक ठरते प्रत्येक वेळी पोलीस बरोबर नसतात. म्हणून सरकारने महंतांना शस्त्र परवाना दिला पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. या वादामुळे महंतांमध्ये किंवा आखाड्यांमध्ये संघर्ष निर्माण झाल्याचे चित्र दिसत आहे. एका आखाड्याच्या महंताला शस्त्र परवाना मिळाला म्हणून दुसऱ्या आश्रमातील महंतांमध्येही शस्त्र बाळगण्याची इच्छा निर्माण झाली. त्यासाठी स्पर्धा सुरू झाली. कुंभमेळ्यात शैव आणि वैष्णव पंथीय यांच्यात पूर्वीपासूनच वाद आहे. बारा वर्षांपूर्वीच्या कुंभमेळ्यात साधूंचे युद्ध जनतेने बघितले. धनुष्यबाण प्रत्येकाच्या हातात होते आणि समोरच्या साधूंवर सोडले जात होते. अनेक जण त्याच्यात जखमी झाले. त्याची प्रसिद्धी झाली. साधूंची आणि आखाड्यांची अप्रतिष्ठा झाली परंतु त्यांना काही याबाबत घेणे देणे नव्हते. आताही तीच परिस्थिती निर्माण होऊ बघत आहे. त्यामुळे पोलीस प्रशासन देखील चक्रावले. बंदुकी सोबतच आखाड्यांमध्ये तलवार, भाले,तीरकामटे आणि कुकरी यासारखी शस्त्रे सुरक्षेसाठी असतात. त्यामुळे स्वतंत्रपणे व्यक्तिगत शस्त्रांची आवश्यकता नाही असेही काहींना वाटते. पण अशा लोकांच्या किंवा महंतांच्या वाटण्याला शस्त्र बाळगण्याची इच्छा मनात धरून असणारे वाटाण्याच्या अक्षता लावतात. परिणामी कुंभमेळा होईपर्यंत काय काय होईल हे बघणे औत्सुक्याचे ठरणार आहे. केव्हा काय होईल सांगता यावयाचे नाही.

भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायात स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगितलेली आहेत. स्थित प्रज्ञ बहुदा साधू महात्मे असू शकतात असा सर्वसामान्य माणसाचा समज आहे. दुसऱ्या अध्यायात सांगितलेल्या तत्त्वानुसार, कामना अंतरातील सर्व सोडूनि जो स्वयें, आत्म्यातचि असे तुष्ट, तो स्थित- प्रज्ञ बोलिला.नसे दुःखात उद्वेग सुखाची लालसा नसे, नसे तृष्णा भय क्रोध तो स्थित-प्रज्ञ संयमी! सर्वत्र जो अनासक्त बरे वाईट लाभता, न उल्लासे न संतापे त्याची प्रज्ञा स्थिरावली !! अशी स्थित प्रज्ञाची लक्षणे असून नाशिकला कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या साधूंची जीवनशैली त्याच प्रकारची असावी असे गृहीत तत्व आहे. परंतु ज्या पद्धतीने आखाड्यांकडे सगळी हिंसक शस्त्रे आहेत आणि वरून पुन्हा त्यांना बंदुका हव्या आहेत. याचा अर्थ गेल्या कुंभमेळ्यात जे तीर कामट्यांचे युद्ध झाले तसे बंदुकांचे युद्ध होऊ शकते. याचा अर्थ एवढा तीव्र राग आखाड्यांच्या महंतामध्ये आणि त्यांच्या शिष्योत्तमांमध्ये आहे जो स्थितप्रज्ञ लक्षणांच्या पूर्णपणे विरोधात आहे. असे असताना त्यांच्यासाठी साधू ग्राम, झाडांची कत्तल, वर्षानुवर्षे जपलेली आणि मोठी केलेली वृक्षसंपदा नष्ट करणे. त्यांची आलिशान व्यवस्था करणे आणि त्या व्यवस्थेसाठी हजारो कोटी रुपये सरकारने खर्च करणे हे सर्व संविधान विरोधी आहे. पण आत्ताच्या शासकांना त्या संदर्भात काही सांगण्याची हिम्मत कोणी करीत नाही. माध्यमे देखील ते काम करीत नाहीत. त्यांनी तर मिठाची गुळणीच तोंडात धरून ठेवलेली आहे. हे सगळेच त्या साधूंना घाबरतात असे म्हणावे लागेल. त्यांनी यावे, कुंभमेळा घ्यावा, लोकांनी आणि स्थानिक पातळीवरील संस्थांनी त्यांची व्यवस्था करावी. फार तर सरकारने मलमूत्र निस्सारणासाठी, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी महानगरपालिकेला मदत करावी. परंतु येथे खुद्द सरकारच सगळ्या व्यवस्थेची जबाबदारी घेत आहे. आणि अशा हिंसक आखाड्यांची व्यवस्था करीत आहे हे अनाकलनीय वाटते. या कुंभमेळ्याला सुमारे एक कोटी लोक येणार असा सरकारचा अंदाज आहे.

एवढ्या सगळ्या लोकांची आणि असंख्य आखाड्यांची व्यवस्था करणे केवळ अशक्य होणार आहे. त्यामुळे नाशिककरांचे आरोग्य काही काळासाठी धोक्यात येऊ शकते. ज्या गोदावरीच्या भरोशावर हा कुंभमेळा भरेल ती गोदावरी पूर्णपणे प्रदूषित होईल आणि ते प्रदूषण पुढच्या प्रदेशात जाईल, त्यांचेही स्वास्थ्य धोक्यात येईल अशी शक्यता जास्त असेल. त्या धोक्यासाठी सरकारची काय उपाय योजना आहे याबाबतीत अजून स्पष्टीकरण आलेले नाही. सध्या तरी कुंभमेळा यशस्वी करणे हा एकमेव कार्यक्रम सरकारच्या डोक्यात दिसतो. पण याहूनही महत्त्वाचा प्रश्न म्हणजे सार्वजनिक संसाधनांचा वापर. साधुग्रामासाठी जंगलतोड, आलिशान व्यवस्था आणि हजारो कोटी रुपयांचा खर्च याचे औचित्य तपासले गेले पाहिजे. श्रद्धा आणि धार्मिक परंपरांचा सन्मान राखणे आवश्यक असले तरी संविधानाने दिलेल्या पर्यावरण संरक्षणाच्या आणि समानतेच्या मूल्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कुंभमेळ्यासाठी सुमारे एक कोटी भाविक येण्याची जी शक्यता व्यक्त केली जात आहे त्यानुसार एवढ्या मोठ्या जनसमुदायाची व्यवस्था करणे हे कोणत्याही प्रशासनासमोर मोठे आव्हान असते. गोदावरी नदीवरील ताण, प्रदूषणाचा धोका, आरोग्यविषयक समस्या आणि वाहतूक व्यवस्थेवरील ताण यासाठी दीर्घकालीन नियोजन आवश्यक आहे. विशेषतः गोदावरीचे प्रदूषण हा केवळ नाशिकपुरता मर्यादित विषय नाही; त्याचा परिणाम नदीकाठच्या इतर प्रदेशांवरही होऊ शकतो. त्यावर चर्चा सार्वजनिक पातळीवर झाली पाहिजे. त्यासाठी जनता दरबार भरले पाहिजेत. कारण लोकांना आश्वस्त करणे हे सुद्धा सरकारचे कर्तव्यच आहे. कुंभमेळा हा भारताच्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनातील महत्त्वाचा सोहळा मानला जातो.त्यामुळे त्या संदर्भात कोणी आक्षेप घेत नाही.चर्चा अव्यवस्थेची, आरोग्याची, कायदा व सुव्यवस्थेची आहे आणि तो लोकांचा अधिकार असून लोकांना सगळे काही कळले पाहिजे. कुंभ मेळाव्याचे यश केवळ गर्दीच्या आकड्यांवर मोजता येणार नाही. पर्यावरणाचे संरक्षण, सार्वजनिक पैशांचा विवेकपूर्ण वापर, कायदा-सुव्यवस्था आणि लोकांच्या आरोग्याची सुरक्षितता या निकषांवरही त्याचे मूल्यमापन झाले पाहिजे. श्रद्धा आणि विवेक यांचा समतोल राखला गेला, तरच कुंभमेळा खऱ्या अर्थाने समाजासाठी कल्याणकारी ठरेल.

पान १ वरुन

### शिरपूरच्या तरुणाची तापीत आत्महत्या

यांनी दिलेल्या माहितीनुसार थाळनेर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली. नैराश्यातून आत्महत्या केल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. हवालदार विजय ठाकूर तपास करीत आहेत.

### शिक्षकांवर टीईटीची सक्ती कोणत्या आधारावर?

शिक्षकांसाठी टीईटीची सक्ती स्पष्टपणे नमूद करण्यात आलेली नसल्याचे त्यांनी सांगितले.

**गुणवत्तेचा एकमेव निकष टीईटी कसा?**

शिक्षकांच्या गुणवत्तेचे मूल्यांकन केवळ एका परीक्षेच्या आधारे होऊ शकत नाही, असे मत व्यक्त करताना त्यांनी शिक्षक प्रशिक्षण, कार्यशाळा, डिजिटल शिक्षण, नवोपक्रम आणि व्यावसायिक विकासासाठी शासनाकडून दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जात असल्याकडे लक्ष वेधले. शिक्षकांची गुणवत्ता ही अनुभव, अध्यापन कौशल्य, प्रशिक्षण, विद्यार्थ्यांशी संवाद आणि सततच्या अध्ययन प्रक्रियेतून विकसित होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

**सेवासुरक्षा आणि नैसर्गिक न्यायाचा मुद्दा**

वर्षानुवर्षे सेवा बजावत असलेल्या शिक्षकांच्या भवितव्यावर परिणाम करणारे निर्णय घेताना वैधानिक अपेक्षा, नैसर्गिक न्यायाची तत्त्वे आणि सेवासुरक्षेच्या बाबी विचारात घेणे आवश्यक असल्याचे मुळे यांनी म्हटले आहे. अशा निर्णयांसाठी स्पष्ट धोरण, संक्रमणकालीन व्यवस्था आणि व्यापक चर्चा आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.सध्याचा प्रश्न केवळ टीईटी किंवा नॉन-टीईटी शिक्षकांपुरता मर्यादित नसून, तो शिक्षकांच्या सेवाशर्ती, सन्मान आणि कायदेशीर संरक्षणाशी संबंधित असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे सर्व शिक्षक व कर्मचारी संघटनांनी मतभेद बाजूला ठेवून एकत्रित भूमिका घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आदर राखत असतानाच, एनसीटीईच्या तरतुदी, प्रशासकीय निर्णय आणि शिक्षकांच्या वैध अपेक्षांच्या अनुषंगाने या विषयाचा व्यापक पुनर्विचार होणे आवश्यक असल्याचे मत भाजपा शिक्षक आघाडीचे नाशिक विभाग संयोजक महेश मुळे, प्रदेश सदस्य डॉ. नितीन कापडीस, मनोहर चौधरी यांच्यासह अविनाश पाटील, जितेंद्र कागणे, रोहिणी मुळे, अपर्णा पाटील, आनंद पाटील, संदीप सोनवणे, योगेश देवरे, देवेंद्र गिरासे, कमलेश भदाणे, प्रवीण बाविस्कर, अमोल शिंदे, विनोद जैन, इंद्रजित जमादार, कैलास अमृतकर, संजय वाघ, भूपेंद्र मालपुरे आदी पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

### जागतिक पर्यावरणदिन ओमनगरात हरित संकल्प

जबाबदारी हा संदेश देत उपस्थितांनी लावलेल्या प्रत्येक झाडाच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारली. कार्यक्रमास मांडळ गावाचे पंचायत समिती सदस्य यतीश सोनवणे यांनी विशेष उपस्थिती दर्शवून पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी नागरिकांना अधिकाधिक वृक्ष लागवड करून त्यांचे संवर्धन करण्याचे आवाहन केले.

वृक्षदान करून या उपक्रमाला मोलाचे सहकार्य करणाऱ्या सर्व वृक्षदाते, सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरणप्रेमी यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले. त्यांच्या योगदानामुळे हा उपक्रम अधिक यशस्वी ठरला. तसेच स्थानिक नागरिकांनी श्रमदान करून परिसर स्वच्छता व वृक्षारोपणाची कामे केली.

कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी सर्व नागरिक, स्वयंसेवक, महिला मंडळ सदस्य तसेच वृक्षदाते यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा हा संकल्प केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता वर्षभर वृक्षसंवर्धनाच्या माध्यमातून कायम ठेवण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

### बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र-गोवाच्या सदस्यपदी बागुल

नंदुरबार जिल्ह्यातुन देखील वकीलांनी मोठा प्रतिसाद दिल्याने त्याना सर्वाधिक प्रेफ्रन्सीव वोट मिळाले आहे. ॲड.बागुल हे महाराष्ट्र सरकारचे पॅनल ॲडव्होकेट असून धुळे जिल्हा परिषद सह, शिरपूर नगर परिषद, चोपडा नगर परिषद, नंदुरबार नगर परिषदसह विविध साखर कारखाने, सहकारी संस्था, शिक्षण संस्थांचे पॅनल ॲडव्होकेट आहेत. त्यानी आता पर्यंत विविध गाजलेले केसेस मध्ये बाजू मांडलेली आहे. ते शिरपूर नगर परिषदेच्या माजी नगराध्यक्ष कुसुमताई बागुल व सुरेश बागुल यांचे सुपुत्र आहेत. त्याच्या या निवडी बद्दल संपूर्ण धुळे जिल्ह्यासह लगतच्या जळगाव,नंदुरबार, नाशिक जिल्ह्यातील वकीला सह धुळे बार चे माजी अध्यक्ष ड.बाबा जोशी, ड.एल.पी.ठाकूर, जेष्ठ विधतज्ञ ड.रवी देसरडा, ॲड.ए. बी.शहा, ॲड.जितेंद्र निळे, ॲड.डी. डी. जोशी, ॲड. वाल्मिक कचवे-पाटील, ॲड.रणजित नगराळे, ॲड.नदीम अन्सारी, ॲड.अमोल पाटील, शिरपूर येथील ॲड. एस.के.महाजन, ॲड.ललित महाजन, ॲड.अमित जैन आदींनी कौतुक केले आहे. ॲड.ज्ञानेश्वर बागुल यांची महाराष्ट्र व गोवा स्टेट बार कौन्सिल मधील नेतृत्वामुळे वकिलांच्या प्रश्नांना सक्षम व्यासपीठ मिळेल आणि न्यायव्यवस्थेच्या बळकटीसाठी नवे अध्याय लिहिला जाणार आहे.

### रेल्वे अंडरपास लवकर पुर्ण करा

बोगद्यालगत ड्रेनेज लाईन उभारणीचे काम हाती घेतले आहे. या कामाची प्रत्यक्ष पाहणी करताना आ. चंद्रकांत रघुवंशी यांनी कामाचा आढावा घेतला व गुणवत्तेबाबत आवश्यक सूचना दिल्या.

यावेळी बांधकाम सभापती देवेंद्र जैन, पाणीपुरवठा सभापती कैलास पाटील, नगरपालिकेचे नगर अभियंता गणेश गावित, रेल्वेचे सहाय्यक मंडळ अभियंता राधेश्याम मीना तसेच रेल्वे अभियंता सुनील यादव उपस्थित होते.

२ ठिकाणी खुल्या ड्रेनेज लाईन

बोगद्यात साचणाऱ्या पाण्याचा निचरा करण्यासाठी २ ठिकाणी खुल्या ड्रेनेज लाईनची उभारणी करण्यात येत आहे. एकता नगरकडून एक ड्रेनेज लाईन तयार करण्यात आली असून, दुसरी लाईन बोगद्यापासून बापू नगर मार्गे पाताळगंगा नदीलगतपर्यंत नेण्यात येणार आहे. सुमारे १ हजार १५० मीटर लांबीच्या या ड्रेनेज प्रकल्पाचे काम सध्या प्रगतीपथावर असून ते लवकरच पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती रेल्वे विभागाने दिली आहे.

या कामामुळे पावसाळ्यात रेल्वे अंडरपासमध्ये पाणी साचण्याची समस्या कमी होऊन नागरिकांची वाहतूक व्यवस्था सुलभ होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मूळव्याध (पाइल्स) : वाढती समस्या, योग्य माहिती आणि वेळेवर उपचार गरजेचे, नको लाजणे आणि मुकं भोगणे

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत बदललेला आहार, कमी शारीरिक हालचाल आणि वाढलेला ताण यामुळे मूळव्याध किंवा पाइल्सचा त्रास वाढताना दिसून येत आहे. अनेक लोक हा आजार लपवून ठेवतात किंवा घरगुती उपायांवर अवलंबून राहतात. मात्र योग्य माहिती आणि वेळेवर उपचार घेतल्यास हा त्रास नियंत्रणात आणता येऊ शकतो.

**मूळव्याध म्हणजे नेमके काय?**

गुदद्वार आणि मलाशयाच्या खालच्या भागातील रक्तवाहिन्या फुगून त्यांना सूज येते, तेव्हा त्याला मूळव्याध किंवा पाइल्स म्हणतात. या सूज आलेल्या रक्तवाहिन्यांमुळे वेदना, रक्तस्राव किंवा गाठी निर्माण होऊ शकतात.

**मूळव्याधचे दोन प्रकार**

अंतर्गत मूळव्याध : ही गुदमार्गाच्या आत असते. सुरुवातीला वेदना कमी असतात, परंतु शौचाच्या वेळी रक्तस्राव होऊ शकतो., बाह्य मूळव्याध : ही गुदद्वाराच्या बाहेर असते. यात वेदना, सूज, खाज आणि बसताना त्रास अधिक जाणवू शकतो.

**मूळव्याध का होते?**

मूळव्याध होण्यामागे अनेक कारणे असू शकतात : दीर्घकाळ मलावरोध (कॉन्स्टिपेशन), शौचाच्या वेळी जास्त जोर लावणे, कमी तंतुमय (फायबरयुक्त) आहार, कमी पाणी पिणे, लठ्ठपणा, गर्भधारणा, सतत बसून काम करणे, व्यायामाचा अभाव, दीर्घकाळ उभे राहणे, वाढते वय, काही लोकांमध्ये आनुवंशिक कारणांमुळेही हा त्रास दिसून येऊ शकतो.

**कोणती लक्षणे दिसू शकतात?**

मूळव्याधची लक्षणे व्यक्तीनुसार वेगवेगळी असू शकतात : शौचाच्या वेळी किंवा नंतर ताजे लाल रक्त जाणे, गुदद्वाराजवळ गाठ किंवा सूज जाणवणे, वेदना किंवा जळजळ, खाज येणे, शौचानंतरही पूर्ण साफ न झाल्यासारखे वाटणे, बसताना त्रास होणे, लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे प्रत्येक रक्तस्राव हा मूळव्याधमुळेच होतो असे नाही. काही वेळा इतर गंभीर आजारांमुळेही रक्तस्राव होऊ शकतो.

**मूळव्याध टाळण्यासाठी काय करावे?**



**डॉ. रवी वानखेडकर**
प्रॉक्टोलॉजिस्ट (मुळव्याध तज्ञ)
मो.९४२२२ ९६४९५

जीवनशैलीतील काही साधे बदल मूळव्याध टाळण्यास मदत करू शकतातः फायबरयुक्त आहार घ्या - फळे, भाज्या, सॅलड, कडधान्ये आणि संपूर्ण धान्ये यांचा आहारात समावेश करा. भरपूर पाणी प्या - पुरेसे पाणी पिल्याने मल मऊ राहतो आणि शौचास त्रास कमी होतो. नियमित व्यायाम करा - दररोज चालणे, हलका व्यायाम किंवा योगामुळे पचनक्रिया सुधारते. शौच रोखून धरू नका - शौचाची इच्छा झाल्यावर उशीर करू नये. शौचालयात जास्त वेळ बसणे टाळा - मोबाईल वापरत किंवा वर्तमानपत्र वाचत जास्त वेळ बसल्याने गुदद्वारावर ताण वाढू शकतो.

**उपचार कोणते आहेत?**

उपचार हा आजाराच्या टप्प्यावर अवलंबून असतो. सुरुवातीच्या अवस्थेतः आहारातील बदल, फायबर सप्लिमेंट्स, औषधे, मल मऊ ठेवण्यासाठी उपाय, गरम पाण्याची बसून आंघोळ

**पुढील अवस्थेत:**

जर गाठी मोठ्या झाल्या असतील किंवा वारंवार रक्तस्राव होत असेल तरः इंजेक्शन उपचार, रबर बँड लिगेशन, लेझर उपचार, शस्त्रक्रिया अनेक लोकांना वाटते की एकदा मूळव्याध झाली की नेहमी शस्त्रक्रिया करावी लागते. हे चुकीचे आहे. अनेक रुग्ण औषधे आणि जीवनशैलीतील बदलांनी सुधारतात. डॉक्टरांकडे कधी जावे?

**वैद्यकीय सल्ला गरजेचा**

वारंवार रक्तस्राव होत असल्यास, तीव्र वेदना असल्यास, गाठ बाहेर येऊन आत जात नसल्यास, वजन कमी होणे किंवा अशक्तपणा जाणवत असल्यास, घरगुती उपायांनी आराम न झाल्यास

**गैरसमज आणि सत्य**

गैरसमज : तिखट खाल्ल्यानेच मूळव्याध होते, सत्यः तिखट पदार्थ त्रास वाढवू शकतात, पण ते एकमेव कारण नाही., गैरसमजः रक्त आले म्हणजे नक्की मूळव्याधच, सत्यः इतर कारणांचीही तपासणी आवश्यक असते., गैरसमजः मूळव्याध लपवून ठेवावी, सत्यः लवकर उपचार घेतल्यास गुंतागुंत टाळता येते.

**निष्कर्ष**

मूळव्याध हा अतिशय सामान्य पण दुर्लक्षित आजार आहे. योग्य आहार, नियमित व्यायाम, पुरेसे पाणी आणि वेळेवर वैद्यकीय सल्ला यामुळे हा त्रास मोठ्या प्रमाणात टाळता येतो. लाज न बाळगता लक्षणे ओळखा आणि योग्य वेळी उपचार घ्याकारण आरोग्याची काळजी घेणे हीच खरी प्रतिबंधात्मक उपाययोजना आहे. मूळव्याधीसारख्या त्रासात अप्रमाणित उपचार, गावठी उपाय किंवा अपात्र व्यक्तींकडून उपचार घेऊन वेळ वाया घालवू नका. योग्य तपासणी आणि आधुनिक वैज्ञानिक उपचारांसाठी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्या.

आरोग्याची काळजी घ्या, लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका.

### एक दिवस सायकलसाठी नवापूरला सायकल रॅली

नवापूर, दि. ७ - नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने नवापूर पोलिस प्रशासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली एक दिवस सायकलसाठी आरोग्यासाठी ही सायकल रॅली रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या उपक्रमाला पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सकाळी ७ वाजता नवापूर पोलिस ठाण्यापासून रॅलीला प्रारंभ करण्यात आला. नवापूर पोलिस ठाणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, देवलफळी, एमआयडीसी परिसर असा मार्गक्रमण करत रॅली पुन्हा नवापूर पोलिस ठाण्यात येऊन संपन्न झाली. रॅलीदरम्यान नागरिकांना नियमित व्यायाम, सायकलचा वापर, पर्यावरण संरक्षण आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यात आला.यावेळी नवापूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अभिषेक पाटील, विसरवाडी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक जयेश खलाणे, पोलिस उपनिरीक्षक अभिजीत अहिरे, पोलिस उपनिरीक्षक भाऊसाहेब लाडगे यांच्यासह नवापूर पोलिस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रॅलीच्या माध्यमातून आरोग्य संवर्धनासोबतच पर्यावरणपूरक वाहतुकीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

### मुस्लीम ओबीसी तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**धुळे, दि.७ - आज दि. ७ जून रोजी शहरातील उर्दू व अल्पसंख्याक शाळेतील १० वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मुस्लीम ओबीसी एसबीसी संघर्ष समितीतर्फे शहरात सत्कार करण्यात आला विशेष गुणवंत विद्यार्थ्यांचा घरी जाऊन गुणवंत विद्यार्थी सोबत त्यांचे पालकांचे देखील सत्कार करण्यात आला.**

त्यात नॅशनल उर्दु शाळेचा-आतिफ शेख असलम, मौलाना उर्दु गर्लज शाळेची-अकसा शेख नदीम, स्वेस शाळेची-अन्सारी जवेरिया शाहिद, आर.एम.पटेल शाळेची-इकरशा नवीद अन्सारी, नूर उर्दु शाळेची-लाईबा शफिउल्लाह खान, हज्जन सायरा बोना गर्लज शाळेची-शिमा अकिल अहमद अन्सारी, आर.मास्टर शाळेची-मदिहा फयाजोद्दीन मलिक यांचा समावेश होता. त्यावेळी मुस्लीम ओबीसी समितीचे पदाधिकाऱ्यांनी शहराचे, मोलवीगंज, घडयाल मस्जिद, आंबेडकर नगर, दिलदार नगर, अन्सार नगर, मुल्ला कॉलनी चाळीसगांवरोड, जामचा मळा, १०० फुटी रोड, बोरसे कॉलनी, आणि कबीरगंज वडजई रोड परिसर या भागात जाउन कार्यक्रमपूर्ण केला. त्यावेळी सोबत नाजनीन शेख, इमरान आझमी, गुड्डु काकर, गुलाम कुरेशी, अन्सारी अब्दुल हफिज, डॉ.शकील शेख, अन्सारी जाहीद हुसैन, प्पु सोनी, वसीम खान, अन्सारी अताउरहेमान, बबलु भाई, सलिम पटेल, अब्दुल्ला आझमी, तसेच मुस्लीम ओबीसी एसबीसी संघर्ष समितीचे अध्यक्ष-अशफाक शेख व आरीफ अन्सारी, जमील युसुफ शाह, रियाज पठान, अदनान अन्सारी, लुकमान शेख, अन्सारी नदिम, सरफराज अन्सारी, राजु पिंजारी, रिजवान अन्सारी यांनी परिक्षम घेतले.

### पावसाची धुळेकरांना हुलकावणी

धुळे, दि.७ - हवामान खात्याचे अंदाज चुकीचे ठरवित पावसाने धुळेकरांना हुलकावणी दिली आहे. मृग नक्षत्राला सुरुवात झाली पण पावसाने हजेरी लावली नाही. वाढत्या उकाड्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यात वारवार खंडीत होणाऱ्या वीजपुरठ्याने भर घतली आहे.

धुळे शहराचे तापमान सातत्याने ४० अंशावर राहीले आहे. हवेतील कोरडेपणा वाढल्यामुळे नागरिकांचे लक्ष पावसाकडे लागले आहे. हवामान खात्याने जुनच्या पहिल्या आठवड्यात पाऊस येईल पण पावसाने हलुकावणी दिली.








रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

प्रकाश में आज
पुलिस ऑफिसर




जॉकी श्राफ, करिश्मा कपूर, परेश रावल, सदाशिव अमरापूरकर


### पांडू बापू माळी म्युनिसिपल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय शिरपूर जिल्हा धुळे.

**पाहिजेत**

शिरपूर वरवाडे नगरपरिषद संचलित पांडू बापू माळी म्यूनिसिपल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय शिरपूर जि.धुळे मध्ये सन २०२६-२०२७ या वर्षात सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणारी खालील प्रमाणे नमूद केलेली पदे भरावयाची असून त्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. नं. | पद नाम | किमान शैक्षणिक अर्हता | संवर्ग | एकूण पद व संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपीक १००% अनुदानित माध्यमिक | कुठल्याही शाखेचा पदवीधर MS-CIT व संगणक टंकलेखन मराठी व इंग्रजी परीक्षा उत्तीर्ण आवश्यक | १ अनु. जाती (S.C) १ इतर मागासवर्ग (O.B.C) | ०३ |
| २ | प्रयोगशाळा सहायक १००% अनुदानित माध्यमिक | बी.एस.सी किंवा डी फॉर्मसी | १ आर्थीक दृष्टया दुर्बल घटक (EWS) | ०२ |
| ३ | प्रयोगशाळा सहायक अंशःअनुदानित उच्च माध्यमिक | बी.एस.सी किंवा डी फॉर्मसी | ३ खुला (OPEN) | ०१ |

उपरोक्त जात प्रवर्गातील उमेदवारांनी आपली नांवे जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र धुळे यांच्याकडेस नोंदविलेली असली पाहिजेत.

सदर जाहिरात प्रसिध्द झाल्या पासून ७ दिवसांच्या आंत आपले अर्ज म.मुख्याध्यापक पां.बा.मा. म्युनिसिपल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय शिरपूर जिल्हा धुळे यांच्या नांवे समक्ष अगर पोष्टाने पाठवावीत. अर्जासोबत शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेची गुणपत्रके व प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती तसेच बायोडाटा फोटोसह जोडणे आवश्यक आहे. तसेच अनु.जाती, इतर मागासवर्ग, आर्थीक दृष्या दुर्बल घटक संवर्गातील उमेदवारांनी आपले जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| एस. आर. गवळी | शामकांत जगन्नाथ ईशी |
| सचिव | सभापती |
| शालेय शिक्षण समिती | शिक्षण समिती |
| पांडू बापू माळी म्युनि. हायस्कूल, | शिरपूर वरवाडे नगरपरिषद |
| शिरपूर जिल्हा धुळे | शिरपूर जि.धुळे. |

# सावळदे येथे आज कथा सोहळा सांगता

तऱ्हाडी, दि.७ - अधिक मासानिमित्त सावळदे येथील श्री तीर्थक्षेत्र तापीघाट महादेव मंदिरात सुरू असलेल्या भव्य शिवमहापुराण कथा सोहळ्याची आज भक्तिमय वातावरणात सांगता होत आहे. गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या या आध्यात्मिक पर्वाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून तापीघाट परिसर शिवनामाच्या गजराने दुमदुमून गेला आहे. आज सकाळी ८ ते १० या वेळेत कृष्णकृपा प्रेममूर्ती ह.भ.प. दिलीपजी महाराज (वृंदावन धाम) जळगावकर यांच्या अमृतमय वाणीतून शिवमहापुराण कथेला अंतिम स्वरूप प्राप्त होणार आहे. शिवतत्त्व, भक्ती, संस्कार आणि मानवकल्याणाचा संदेश देणाऱ्या या कथामालेने भाविकांच्या मनावर विशेष छाप पाडली आहे.



# कर्म.आ.मा.पाटील महाविद्यालयात शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

**पिंपळनेर, दि.७ (प्रतिनिधी) - पिंपळनेर येथील कर्म.आ मा.पाटील कला वाणिज्य व कै.अण्णासाहेब एन.के.पाटील विज्ञान महाविद्यालयात उत्साहात आणि श्रद्धेने शिवराज्याभिषेक दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.लहू पवार यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.**

सोहळ्याची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. उपस्थितांनी दीपप्रज्वलन करून प्रतिमा पूजन व वंदन केले आणि महाराजांच्या कारभार व शौर्याचे स्मरण केले.कार्यक्रमात प्राचार्य डॉ.लहू पवार यांनी शिवराज्याभिषेकाच्या ऐतिहासिक महत्त्वावर माहिती दिली.

कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापकेत्तर कर्मचारी, पालक, विद्यार्थी यांनी पण महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले.महाविद्यालय प्रशासनाने भविष्यातही अशा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना चालना देण्याचे आश्वासन दिले. यावेळी वरिष्ठ महाविद्यालयात शिवराज्याभिषेक दिना निमित्त श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमा पूजन प्रसंगी प्राचार्य प्रो.लहू पवार, गवळे आप्पा, सौरभ बेनुस्कर,सुनील पवार, रविंद्र शेलार, कैलास जिरे,उषा ठाकूर,मिलिंद कोठावदे आदी उपस्थित होते.

# पर्यावरण दिन विद्यावर्धनीमध्ये साजरा

धुळे दि. ७, - पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण करणे, ही केवळ काळाची गरज नसून तो संपूर्ण मानव जातीच्या आणि या वसुंधरेच्या अस्तित्वाचा प्रश्न असल्याने वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करणे यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयतकांबरोबरच जनप्रबोधनही करावे, असे प्रतिपादन विद्यावर्धिनी सभा आणि गव्हर्निंग कौन्सिलचे सेक्रेटरी व खजिनदार युवराज करनकाळ यांनी महाविद्यालयात केले.

येथील विद्यावर्धिनी सभेचे मा.य वैद्य कला, प्रा. पी डी. दलाल वाणिज्य आणि डी एस शहा विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जगदीश पाटील उपस्थित होते. वृक्षारोपण ही उद्याच्या पिढ्यांना आपण दिलेली एक अमूल्य भेट आहे. त्यामुळे पर्यावरण संतुलनासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन हरित महाराष्ट्राच्या निर्मितीत योगदान द्यावे असे श्री करनकाळ म्हणाले.

कार्यक्रमाला योजनेचे समन्वयक डॉ. संतोष खत्री, डॉ. प्रशांत लगडे डॉ. सर्जेराव गोल्डे, डॉ. बाळासाहेब गणपाटील, डॉ. वाय एन पाटील, हेमंत पाटील, डॉ. उज्वला वाणी, अर्चना वळवी, के बी पाटील, रोहित भतवाल, अशोक मुजगे, डॉ.बाजीराव पाटील उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन-** मौजे पिंपरी ता.जि. धुळे येथील गट नं.७०/५/अ चे एकूण क्षेत्र ० हे. २० आकार १ रु.५० पैसे भुधारणा पध्दत १ यापैकी ० हे. ०५ आर अशी शेतजमिन तुम्हांस कायम खरेदी देण्याचा सौदा केला ती माझे मालकीची शेतजमीन त्याची चतुसिमा गांव नकाशा प्रमाणे

वर नमूद वर्णन केलेला शेतीजमीन/मिळकत ही शेख एकबाल युनुस रा.धुळे यांचे मालकीचे व प्रत्यक्ष कबजे ताबे उपभोगातील आहे. सदरची मिळकत आमचे अशिल यांनी कायम खरेदी करण्याबाबत सौदा केला आहे. व बयाणा अदा केलेला आहे. सबब आमचे अशिल वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

वर नमूद शेतजमीन/मिळकतीवर नमूद केलेल्या मालका व्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, तारण, टाच, बोजा, खरेदी विक्री, करार, हस्तांरतण हिस्सा, व्यवहार, अधिकार अगर हितसंबध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आंत आमचे खालील पत्यावर लेखी व मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी परस्पर वर्तमानपत्रात जाहीर केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

वरील कालावधीत कुणाचीही कोणतीही हरकत न आल्यांस वरील शेतजमीन/मिळकत ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहित धरुन आमचे अशिल वर नमूद शेतजमीन/मिळकतीचा अंतिम व्यवहार पूर्ण करतील. आणि त्यानंतर कोणतीही तक्रार आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही यांची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व सांगणेवरुन आमचे मार्फत दिली असे.

धुळे, दिनांक:- ०७/०६/२०२६.

**ॲड.लखमीचंद अ.गुजर**
ॲडव्होकेट व नोटरी
ग.नं.२, घर नं.३३२६, मुल्लावाडा, धुळे.
**मो.नं.९४२३४९३०८९**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, खाजगी सावकार व सर्व संबंधीतीयांना तसेच विशेषत: ॲक्सीस बँक लि., शाखा- ARCC, पहिला मजला, माझदा टॉवर, त्र्यंबक नाका, जि.प.समोर, नाशिक व शाखा-धुळे यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा धुळे पोट तुकडी तालुका धुळे पैकी धुळे महानगरपालिका हद्दीतील देवपूर येथील सिटी सर्व्हे नं.४५०८, स.नं.४१/१ प्लॉट नं.३, क्षेत्र ५१८.०० चौ.मी. देवपुर, धुळे, ता.जि.धुळे यासी चतु:सिमा हया गाव रेकॉर्ड ऑफ राईटसप्रमाणे-

येणेप्रमाणे मिळकत ही आमचे पक्षकार ताराचंद शंकर मोरे व त्यांचे (वारस) मुले यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील आहे. परंतू ॲक्सीस बँक लि., शाखा- ARCC, पहिला मजला, माझदा टॉवर, त्र्यंबक नाका, जि.प.समोर, नाशिक व शाखा-धुळे यांनी वर नमूद मिळकतीचा बेकायदेशीरपणे ताबा घेतलेला होता. तसेच दि.२६/०५/२०२६ रोजी ॲक्सीस बँकेने पाठविलेली नोटीस **the secured asset came to be sold by the Bank in lawful exercise of statutory powers conferred under the SARFAESI Act and issued valid Sale Certificate** याचा अर्थ की, ॲक्सीस बँक यांनी **sell certificate SARFAESI Act** याचा गैरफायदा घेवून आमचे पक्षकार यांना कुठलीही नोटीस न पाठवता व आमचे पक्षकार यांच्या मालमत्तेचे कुठलेही मुल्यांकन न काढता ॲक्सीस बँक यांनी परस्पर प्रिया देविलाल शर्मा, रा.मोठया पोस्टाच्या मागे, लक्ष्मी आयस्क्रीम, धुळे, ता.जि.धुळे व प्रमिला भानुदास पाटील, रा.प्लॉट नं.३९, सुमंगल सेक्टर नं.२, प्रमोदनगर, स्टेट बँकेच्या पाठीमागे, देवपुर, धुळे यांच्याशी हात मिळवणी करुन आमचे पक्षकाराची मिळकत ही बेकायदेशीर परस्पर हडप करण्याच्या हेतूने बेकायदेशीर **Sell Certificate Issue** केलेले आहे. तसेच ॲक्सीस बँक यांच्याकडे कुठलाही आदेश नसतांना (सहकार कार्यालय **DDR**), धुळे, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे, दुय्यम निबंधक कार्यालय, धुळे यांची दिशाभूल करुन सुमारे ०८ वर्षापासून आमचे पक्षकार यांची मिळकत ही ॲक्सीस बँक नाशिक यांनी बेकायदेशीररित्या, जबरदस्तीने, ताबा घेतला होता. सदर मिळकतीवर सद्यस्थितीत आमचे पक्षकार यांचा ताबा आहे. आमचे पक्षकार यांच्या असे लक्षात आले आहे की, ॲक्सीस बँक व त्यांचे कर्मचारी व प्रिया देविलाल शर्मा व प्रमिला भानुदास पाटील यांनी संगनमत करुन तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे, दुय्यम निबंधक कार्यालय, धुळे, **DDR** धुळे/सहकार कार्यालय, धुळे यांची देखील फसवणूक करुन आमचे पक्षकार ताराचंद शंकर मोरे यांची मिळकत परस्पर खरेदी-विक्री करुन हडप करण्याच्या तयारीत आहेत.

ॲक्सीस बँक यांच्याकडे लिलाव करण्याचा मा.जिल्हाधिकारी साहेब यांचा कोणताही वरील मिळकती संदर्भात लेखी आदेश नसतांना सदर बँक ही परस्पर सदर मिळकत लिलाव करुन विकण्याच्या प्रयत्नात आहे. तरी वरील मिळकत ही कोणीही लिलावामध्ये खरेदी करु नये, खरेदी केल्यास ती आमचे पक्षकार व त्यांचे वारसांवर बंधनकारक राहणार नाही. खरेदी करणार याची फसवणूक झाल्यास तो स्वत: जबाबदार राहील.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व दस्तऐवजावरुन त्यांचे सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. कळावे.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस असे. ठिकाण- , दि.०६/०६/२०२६.

**ॲड.प्रशांत बी.झगडे**
निवास/कार्यालय- मु.पो.न्याहळोद, ता.जि.धुळे. **मो.नं.९१५८८६५८१०**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, सरकारी, निमसरकारी संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा धुळे, पोट तुकडी तालुका धुळे पैकी मौजे धुळे महानगरपालिका हददीतील सर्व्हे नं.३९६ फायनल प्लॉट नं.४० यापैकी प्लॉट नं.१७ यातील भाग नं. ६५/६६/६७/६८ यासी एकूण क्षेत्र ४१५.५७ चौ.मी.यापैकी भाग नं.६७ चे क्षेत्र ४६.४६ चौ.मी. ५०० चौ.फुट यापैकी दक्षिण पश्चिमेकडील क्षेत्र २३.२३ चौ.मी. सुमारे २५० चौ.फुट बखळ प्लॉट मिळकत यासी चतु:सिमा खालील प्रमाणे -:

पुर्वेस- भाग नं.६७ चा उर्वरीत भाग, पश्चिमेस- भाग नं.६८,
दक्षिणेस- १० फुट रस्ता, उत्तरेस- २० फुट रस्ता.

येणे प्रमाणे चतु:सिमातील वर्णनाची मिळकत ही श्री.भास्कर शंकर मुलमुले रा.१८, अलंकार सोसायटी, अरिहंत भवन जवळ धुळे यांचे मालकी व ताबे उपभोगातील असून त्यांनी आमचे अशिल श्री.प्रकाश मोहन पाटील व सौ.प्रमिलाबाई प्रकाश पाटील रा. माणिक नगर, अरिहंत भवन जवळ धुळे यांच्याशी वरील मिळकतीचा कायमस्वरूपी खरेदी विक्री करण्याबाबतचा सौदा केलेला असून त्यांनी बयाणा पोटी रक्कम दिलेली आहे.

तरीही सदर वरील मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही स्वरूपाचे सौदे, करार, बक्षीस, गहाण, दान, खावटीपोटगी, लिजडिंड, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, बोजे, ताबा, अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार इतर तबदिलीचे व्यवहार असतील तर सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्यावर पुराव्यानिशी मुळ कागदपत्रांसह लेखी हरकत घ्यावी. सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्बोज, निर्विवाद व हस्तांतरणीय आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीबाबत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची नोटिस आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व दाखविलेल्या कागदपत्रावरून व सांगण्यावरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

ठिकाण- धुळे, दिनांक- ०७/०६/२०२६. नोटीस देणार तर्फे ॲण्ड.

**ॲड.परमेश्वर ए.चौधरी**
पत्ता- आधार कमल बंगलो, प्लॉट नं.४अ, नित्यानंद नगर,
निरामय हॉस्पिटल मागे, ८० फुटी रोड, धुळे-४२४००१.
**मो.नं.९४२३२८९१००**

## जाहीर नोटीस

तमाम जनता, सर्व कौटुंबिक, सामाजिक व व्यावसायिक हितसंबंधिय, सर्व पतसंस्था, राष्ट्रीयकृत वित्तीय संस्था, सुक्ष्म व गृह अर्थसहाय्य संस्था, खाजगी अर्थसहाय्य कर्ता, शासकीय-निमशासकीय कार्यालये, गृहनिर्माण सोसायट्या, नोंदणी कार्यालय, महानगरपालिका, महसुल नगर भूमापन विभाग, म.रा.वि.वि.कं. आदी तसेच या नोटीसीतील मिळकतीचे पुर्वोक्त खरेदी-विक्री कर्ता यांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की,

आमचे अशिलांनी सौ भावना गणेश अहिरे व श्री गणेश रमेश अहिरे यांचे प्रत्यक्ष कब्जे उपभोग व वहिवाटीतील तुकडी जिल्हा धुळे, पोट तुकडी तालुका धुळे पैकी मौजे धुळे महानगरपालिका हद्यीतील वलवाडी येथील निवासी मिळकत म्हणजेच...

मौजे वलवाडी येथील स.क्र.९/६ पैकी प्लॉट क्र १९ चे एकूण क्षेत्र १८५.०० चौ.मी. पैकी अविभाज्य पुर्वेकडील क्षेत्र ९२.५० चौ.मी. क्षेत्राच्या निवासी भुखंडाची मिळकत, ज्यासी मापे पुर्व-पश्चिम १८.५० मी व दक्षिणोत्तर ५.०० मी, यासी चतुःसिमा : पुर्वेस : प्लॉट क्र १८, पश्चिमेस : याच प्लॉट क्र १९ चा उर्वरित भाग, दक्षिणेस : ९ मी चा रस्ता व उत्तरेस : प्लॉट क्र १५, अशी मिळकत दिर्घ कालावधीपूर्वी निश्चित केल्याप्रमाणे कायम स्वरुपी विकत घेण्याचा रितसर व्यवहार लिखित नोंदणीकृत दस्ताने आपसातील किंमतीपोटी बयाणा रकमेचा पूर्ण भरणा अदा करुन कायम केलेला आहे.

तरी सदरहू निवासी मिळकत व उर्वरित बखळ भूखंड मिळकतीसंबंधी कोणाचेही काही एक व्यवहार असल्यांस व नियोजित व्यवहाराचे पूर्ततेस कोणाही संबंधितांचे काही एक म्हणणे, हरकत/हरकती आक्षेप असल्यास आणि/किंवा या मिळकतीशी कोणत्याही प्रकारचे तोंडी वा लेखी हक्क-हितसंबंध अथवा काही एक व्यवहार जोडलेले असल्यांस, त्याबाबत लिखित वा दस्तऐवजी सपुराव्याने खालील स्वाक्षांकित यांचेकडेस या जाहिर नोटीस प्रसिध्दीपासून १५ (पंधरा) दिवसांचे आंत सादर कराव्यात. तोंडी अथवा या मुदतीनंतर आलेल्या तसेच परस्पर वृत्तपत्रातुन प्रसिध्द केलेल्या कोणाच्याही कोणत्याही हरकती कदापी विचारांत घेतल्या जाणार नाहीत व सदरची मिळकत ही निर्वेध असल्याचे ग्राह्य धरण्यांत येईल. ओघानेच या मुदतीनंतर आलेल्या हरकती व आक्षेप हे बेकायदेशीर व रद्यबातलच ठरतील याची नोंद घ्यावी.

वर नमूद मुदतीत कोणाच्याही काही एक सपुरावा हरकत/हरकती न आल्यांस वर नमूद मिळकतीसंबंधी अंतिम नोंदणीकृत व्यवहार एकमेकांचे सोयीनुसार करण्यास आमचे अशिल मुक्त राहतील याची संबंधितांनी विनंती नोंद घेणेस्तव ही जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर जाहिर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचेमार्फत प्रसिद्वीस दिली असे. दिनांक- ०६/०६/२०२६.

**ॲड.नितीन कन्हैय्यालाल गुजराथी**
४४, नगरपट्टी, पाटबाजार, गांधी पुतळ्याजवळ, धुळे.
**मो.नं.९४२३९६३४३२/९८८११७१४७९**

## जाहीर नोटीस

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज् सो., ज्युनि.डिव्हि. यांचे कोर्टात

दिवाणी कि.अर्ज नं.४१०/२०२६
नि.नं. चौ.ता.१८/०६/२०२६

१) जिजाबाई शालिग्राम साळुंखे, २) प्रमोद शालिग्राम पाटील,
३) मनिषा योगराज पाटील, नं.१ ते ३ रा.साने गुरूजी कॉलनी, थाळनेर,
ता.शिरपूर, जि.धुळे. ....अर्जदार

विरूध्द

कविताबेन ज्ञानेश्वर पाटील,
रा.८५, महादेवनगर-२, साई बाबा मंदिराजवळ,
दिंडोली, उधना, जि.सुरत. ....जाबदेणार

शालिग्राम शिवराम पाटील (साळुंखे),
मयताचा पत्ता- साने गुरूजी कॉलनी, थाळनेर,
ता.शिरपूर, जि.धुळे. मृत्यू दि.२०/०८/२०२४ ....मयत

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती, अर्जदार नं.२, ३ व जाबदेणार यांचे वडील नामे शालिग्राम शिवराम पाटील (साळुंखे) हे दि.२०/०८/२०२४ रोजी मौजे थाळनेर ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं.१ ते ३ व जाबदेणार हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे.न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदार व जाबदेणारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यानी मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दि.१८/६/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत:अगर प्राधिकृत प्रतिनींधीमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही, असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधीश सो., क.स्तर, शिरपूर, जि.धुळे यांचे आदेशावरून प्रसिध्दीस दिली असे.

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

### शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो., कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.कि.अर्ज नं.४७४/२०२६

१) मंगलाबाई चंद्रकांत राजपूत,
२) कुलदीपसिंग चंद्रकांतसिंग राजपूत (तवर),
रा.अ.नं.१ व २ अहिल्यापूर, ता.शिरपूर, जि.धुळे,
३) जयश्री आदित्य राजपूत,
सर्व रा.अहिल्यापूर. ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

X

चंद्रकांत शांतीलाल तवर, मृत्यू दिनांक- २७/०२/२००६,
रा.अहिल्यापूर ता.शिरपूर, जि.धुळे. ....मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे शिरपूर न्यायालयात मयत चंद्रकांत शांतीलाल तवर हे दि.२७/०२/२००६ रोजी उपचार दरम्यान डॉ.वसंतराव पवार मेडिकल कॉलेज आडगाव नाशिक येथे मयत झाले असून, अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काहीएक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावायचा असल्यास त्यांनी दिनांक २९/६/२०२६ रोजी ठीक सकाळी १०:३० वाजता स्वतःअगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही, व कुणाचीही काहीएक हरकत नसल्याचे गृहीत धरून सदर अर्जांबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक २६/५/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

सही/- कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

### शिरपूर येथील मे.सिव्हिल जज्ज् सो., ज्युनि.डिव्ही. यांचे कोर्टात

दिवाणी कि.अर्ज नं.४३८/२०२६
नि.नं.६ चौ.ता.२०/६/२०२६

१) दीपक गुलाबराव पाटील, २) मनोज गुलाबराव पाटील,
दोन्ही रा. मारुती मंदिराजवळ, मराठे गल्ली, शिरपूर, जि.धुळे.
३) कल्पनाबाई देवाजी पाटील, रा.वसारे, ता.अमळनेर, जि. जि.जळगाव.
४) रत्नाबाई मनोहर पाटील, रा. विठ्ठल मंदिर, जुने भामपूर, ता.शिरपूर, जि.धुळे.
५) रेखाबाई राजेंद्र पाटील. रा. स्वराज्य, प्लॉट नं.२६/अ, गंगामाईनगर,
मांडळ शिवार, ता.शिरपूर, जि.धुळे. ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

अनुसयाबाई गुलाबराव पाटील,
मयताचा पत्ता- मारुती मंदिराजवळ, मराठे गल्ली, शिरपूर, जि.धुळे.
मृत्यू दि.१८/०५/२०१९. ....मयत

ज्याअर्थी अर्जदार नं.१ ते ५ यांची आई नामे अनुसयाबाई गुलाबराव पाटील ह्या दि.१८/०५/२०१९ रोजी मौजे शिरपूर, जि.धुळे येथे मयत झालेल्या आहेत. मयतास अर्जदार नं.१ ते ५ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे.न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यानी मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दि.२०/६/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत:अगर प्राधिकृत प्रतिनींधीमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही, असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधीश सो., क.स्तर, शिरपूर, जि.धुळे यांचे आदेशावरील प्रसिध्दीस दिली असे.

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

### शिरपूर येथील मे.सिव्हिल जज्ज् सो., (ज्यु.डि.) यांचे कोर्टात

दिवाणी कि.अर्ज नं.४५४/२०२६, नि.६

१) रमेशसिंह बन्सीलाल सिसोदीया (राजपूत),
२) सतीश बन्सीलाल राजपूत,
३) अलकाबाई विजयसिंग राजपूत,
४) जनाबाई कोमलसिंग चौधरी ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

ज्याअर्थी कै.बन्सीलाल सत्तरसिंग राजपूत (गिरासे) हे दि.०८/०२/२०१५ रोजी व कै.चंद्रकोरबाई बन्सीलाल राजपूत ह्या दि.२६/०२/२०२१ रोजी मौजे-अजंदे बुा. होळनांथे, ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झालेले असून, आता अर्जदार नं.१ ते ४ यांना शासकीय व निमशासकीय कामांसाठी व अर्जदार हेच दोन्ही मयतांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसा संबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दिनांक २३/६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होऊन हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल.

दि.२८/०५/२०२६

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे (शिक्का) सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे

## जाहीर नोटीस

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दि.कि.अर्ज नं.४६०/२०२६, नि.६,

१) किशोर भाऊराव भामरे, २) सुनंदाबाई शालिग्राम पाटील,
३) भारती गुलाब साळुंखे, ४) कल्पनाबाई हिंमत भामरे,
५) दिनेश हिम्मतराव भामरे,
६) सागर हिम्मतराव भामरे ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै.अंजनाबाई भाऊराव पाटील ह्या तऱ्हाडी त.त. ता.शिरपूर जि.धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेगयुलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि.२४/६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि.२९/५/२०२६

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे (शिक्का) सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे

## जाहीर नोटीस

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज् सो., ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात

दिवाणी कि.अर्ज नं.४८६/२०२६,
नि.नं.६ चौ.ता.३०/६/२०२६

१) देवकाबाई आत्माराम बोरसे, २) स्वप्निल आत्माराम बोरसे,
३) निता अरूण वरसाळे, ४) ज्योत्सना मनोजभाई येशी,
५) वैशाली कैलास सोनगीरे, ६) किरण दिनेश ठाकरे,
७) निशा पंकज चित्ते, सर्व रा.प्लॉट नं.६२/बी, संत सेना कॉलनी, करवंद नाका,
शिरपूर, जि.धुळे. ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही. ....जाबदेणार

आत्माराम सुकलाल बोरसे, मयताचा पत्ता- रा.प्लॉट नं.६२/बी, संत सेना कॉलनी,
करवंद नाका, शिरपूर, जि.धुळे. मृत्यू दि.२३/०४/२०२६. ....मयत

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ७ यांचे वडील नामे आत्माराम सुकलाल बोरसे हे दि.२३/०४/२०२६ रोजी मौजे करवंद ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं.१ ते ७ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे.न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यानी मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दि.३०/०६/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वतःअगर प्राधिकृत प्रतिनींधीमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही, असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधीश सो., क.स्तर, शिरपूर, जि.धुळे यांचे आदेशावरून प्रसिध्दीस दिली असे. दि.२६/५/२०२६

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

### शिरपूर येथील दिवाणी न्यायाधिश सो., कनिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात

दि.कि.अर्ज नं.४८८/२०२६, नि.७

बाळू लोटर गुजर वगैरे ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही. ....जाबदेणार

X

आनुबाई लोटन गुजर,
मयताचा पत्ता- रा.कुवे, ता.शिरपूर, जि.धुळे. ....मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे.शिरपूर न्यायालयात आनुबाईलोटन गुजर हे दिनांक २८/०९/२०२४ रोजी कुवे ता.शिरपूर. जि.धुळे येथे मयत झाल्या. त्यामुळे अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्ज़दार यांनी बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काहीएक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावायचा असल्यास त्यांनी दिनांक ३०/६/२०२६ रोजी ठीक सकाळी १०:३० वाजता स्वतःअगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही, व कुणाचीही काहीएक हरकत नसल्याचे गृहीत धरून सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक २६/५/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

सही/- कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

### शिरपूर येथील मे.सिव्हिल जज्ज् सो., ज्युनि.डिव्ही. यांचे कोर्टात

दि.कि.अर्ज नं.४७२/२०२६, नि.क्रं.७

१) सुशीलाबाई श्रीराम माळी, २) दिनेश श्रीराम माळी,
३) राकेश श्रीराम माळी अर्ज. न १ व ३ रा वरवाडे ता.शिरपूर जि.धुळे
४) प्रतिभा नाना माळी रा.कळमसरे ता.शिरपूर जि धुळे
५) छायाबाई रविंद्र माळी रा.जयनगर ता.शहदा जि.नंदुरबार
६) रूपाली अनिल माळी रा. जातोळे ता.जि.धुळे
७) राजसबाई ओंकार माळी. ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

कै.श्रीराम ओंकार माळी, मृत्यू दिनांक- ०७/०१/२०२६,
मृत्यू ठिकाण वरवाडे ता.शिरपूर. ....मयत

ज्या अर्थी अर्जदार नंबर १ ते ७ हे मयत कै.श्रीराम ओंकार माळी मयत यांची मुलगा, मुलगी असे कायदेशीर वारस म्हणून, अर्जदारांनी बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट कलम १८२७ सेक्सन २ प्रमाणे वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज या मेहरबान कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी या नोटीससिने तमाम जनतेस कळविण्यात येते की, तमाम जनते पैकी वरील मयताचे या अर्ज दार नंबर १ ते ६ यांचे व्यतिरिक्त जे कोणी वारस असतील त्यांनी या मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत. अगर दि.२९/६/२०२६ रोजी ठीक १०:३० वाजता स्वतःअगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदार नंबर १ ते ६ यांच्या तोंडी पुरावा घेऊन त्या आधारे मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार नंबर १ ते ६ यांनी केलेल्या मागणी प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर शिरपूर यांचे आदेशावरून प्रसिद्धीस दिले असे.

सही/- कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज् सो., ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात

दिवाणी कि.अर्ज नं.४२२/२०२६,
नि.नं.६ चौ.ता.१९/६/२०२६

१) हमीदाबी शेख कासम, २) एजाज कासम शेख,
३) अंजार शेख कासम, ४) विकार शेख कासम,
५) मुसर्रतबी याकुब खान पठाण,
सर्व रा.जमादार मोहल्ला, वाघाडी, ता.शिरपूर, जि.धुळे. ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही. ....जाबदेणार

शेख कासम शेख रहेमु,
मयताचा पत्ता- जमादार मोहल्ला, वाघाडी,
ता.शिरपूर, जि.धुळे, मृत्यू दि.०८/०१/२०२६. ....मयत

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ५ यांचे वडील नामे शेख कासम शेख रहेमु हे दि.०८/०१/२०२६ रोजी मौजे शहादा, जि.नंदुरबार येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं.१ ते ५ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे.न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यानी मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दि.१९/६/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत:अगर प्राधिकृत प्रतिनींधीमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही, असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधीश सो., क.स्तर, शिरपूर, जि.धुळे यांचे आदेशावरून प्रसिध्दीस दिली असे. दि.२९/५/२०२६

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

### शिरपूर येथील दिवाणी न्यायाधिश सो., कनिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात

दि.कि.अर्ज नं.४८९/२०२६, नि.७

बाळू लोटन गुजर ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही. ....जाबदेणार

X

लोटन गिरधर गुजर, मयताचा पत्ता रा.कुवे,
ता.शिरपूर, जि.धुळे. ....मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे.शिरपूर न्यायालयात लोटन जिरधर गुजर हे दिनांक ३०/११/२०१७ रोजी कुवे ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झाल्या. त्यामुळे अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काहीएक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावायचा असल्यास त्यांनी दिनांक ३/७/२०२६ रोजी ठीक सकाळी १०:३० वाजता स्वतःअगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही, व कुणाचीही काहीएक हरकत नसल्याचे गृहीत धरून सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक ३/६/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

सही/- कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

### शिरपूर येथील दिवाणी न्यायाधिश सो., कनिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात

दि.कि.अर्ज नं.४७६/२०२६, नि.७

लिलाबाई वासुदेव गिरासे वगैरे ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही. ....जाबदेणार

X

वासुदेव नारायणसिंग गिरासे
मयताचा पत्ता रा.वाठोडे, ता.शिरपूर, जि.धुळे. ....मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे.शिरपूर न्यायालयात वासुदेव नारायणसिंग गिरासे हे दि.०४/१२/२०२५ रोजी जुने वाठोडे, ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झाल्या. त्यामुळे अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काहीएक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावायचा असल्यास त्यांनी दिनांक २९/६/२०२६ रोजी ठीक सकाळी १०:३० वाजता स्वतःअगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही, व कुणाचीही काहीएक हरकत नसल्याचे गृहीत धरून सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक २६/५/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

सही/- कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज् सो., जूनि.डिव्हि. यांचे कोर्टात

दि.कि.अर्ज नं.४७४/२०२६, नि.क्र.

सज्याबाई गुड्डु भिल,
रा.कळमसरे ता.शिरपूर, जि.धुळे. ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

कै.उत्तम रतन भिल, मृत्यू दिनांक- २५/१०/२०१४,
मृत्यू ठिकाण कळसमरे, ता.शिरपूर, जि.धुळे. ....मयत

ज्या अर्थी अर्जदार याने मयत कै.उत्तम रतन भिल याचे अर्जदार ही कायदेशीर वारस आहे. म्हणून, अर्जदाराने बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट कलम १८२७ सेक्सन २ प्रमाणे वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज या मे.कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी या नोटीससिने तमाम जनतेस कळविण्यात येते की, तमाम जनते पैकी वरील मयताचे या अर्जदार यांचे व्यतिरिक्त जे कोणी वारस असतील त्यांनी या मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि.२९/६/२०२६ रोजी ठीक १०:३० वाजता स्वतः अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदार यांच्या तोंडी पुरावा घेऊन त्या आधारे मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणी प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधीश सो, कनिष्ठ स्तर शिरपूर यांचे आदेशावरून प्रसिद्धीस दिले असे.

सही/- कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर

**पान १ वरुन**

## विश्वगुरू नागरिकांचे संरक्षण करू शकत नाहीत

श्रीमंत मित्रांच्या तिजोऱ्या भरायच्या.

**पोटावर लाथ मारली : आप**

आम आदमी पक्षानेही या निर्णयावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. पक्षाने म्हटले की, अवघ्या तीन महिन्यांत दुसऱ्यांदा घरगुती गॅस सिलिंडर महाग करण्यात आला आहे. महागाईमुळे जनता आधीच त्रस्त आहे, त्यात मोदी सरकारने त्यांच्या पोटावरच लाथ मारली आहे. तृणमूल काँग्रेस तृणमूल काँग्रेसनेही केंद्र सरकारच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित केले. पक्षाने एक्सवरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात आणखी २९ रुपयांची वाढ. हेच भाजपचे मॉडेल आहे. जेव्हा जागतिक संकटे येतात, तेव्हा गरीब चिंतेत असतात आणि श्रीमंत मात्र भरभराट करत राहतात. विश्वगुरू असल्याचा दावा करणारे सरकार आपल्याच नागरिकांना वारंवार बसणाऱ्या दरवाढीच्या धक्क्यांपासून वाचवू शकत नाही. भविष्याचा विचार करून कुटुंबांना दिलासा देण्याऐवजी, मोदी सरकार सर्वसामान्यांवरच आर्थिक बोजा टाकत आहे. श्रीमंतांसाठी ही किरकोळ गोष्ट असली तरी लाखो कुटुंबांसाठी मात्र घरगुती बजेटवर हा आणखी एक मोठा आघात आहे.

**शरद पवारांची मोदी सरकारवर टीका**

केंद्राच्या निर्णयावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी प्रतिक्रिया देत, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या धोरणांवर कडाडून टीका केली. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रतिक्रिया दिली असून शरद पवारांच्या टीकेलाही उत्तर दिले आहे. केंद्र सरकारच्या गॅस दरवाढीच्या निर्णयामुळे सामान्य नागरिकांच्या घरातील किचनचे बजेट पूर्णपणे कोलमडणार आहे, असे म्हणत खासदार शरद पवार यांनी केंद्राच्या धोरणावर टीका केली. सातत्याने हे दर वाढविले जात आहेत. या सगळ्या गोष्टीचा परिणाम सामान्य माणसाच्या प्रपंचावर होतो. प्रधानमंत्र्यांनी सुरुवातीला आम्ही महागाई नियंत्रित ठेवतो, असे सांगितले. पण, नियंत्रित याचा अर्थ टप्प्या-टप्प्याने धक्का द्यायचा हे त्यांचे सूत्र आहे. त्याची राजकीय किंमत सत्ताधाऱ्यांना योग्य वेळी कळेल, असे म्हणत त्यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला. आता, या दरवाढीचं समर्थन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी युद्धजन्य परिस्थितीचं कारण पुढे केलं आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे जगातील एकही देश असा नाही, जिथे पेट्रोल, डिझेल, गॅसचे भाव वाढलेले नाही. इंधनाचे दर सगळीकडे वाढलेले आहेत. निश्चितपणे केंद्र सरकार त्याची चिंता करत आहे. यापूर्वीही जगात इंधनाचे दर वाढल्यावरच देशात दर वाढले आहेत आणि कमी झाल्यावर कमीही झाले आहेत. त्यामुळे योग्यवेळी योग्य निर्णय होईल, असे फडणवीसांनी म्हटले.

## कॉम्पॅक्टचे पितळ उघडे सरकारचा पराभव : गांधी

सार्थकनेही यावर्षी बारावीची परीक्षा दिली होती. कमी गुण मिळाल्यानंतर त्याने आपल्या स्कॅन केलेल्या उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन करण्याची विनंती केली होती. चुकीने गुण कमी केल्याचे आणि इतर समस्यांचे आपले अनुभव सार्थकने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. सार्थकने सीबीएसई सुधारणांवरील संसदीय स्थायी समितीला पाचशे पानांचे सादरीकरणही सादर केले आहे.

कोणत्याही गोष्टीबद्दल जे करायला हवे, तेच मी केले. प्रत्येकामध्ये गोष्टी समजून घेण्याची आणि व्यवस्था पारदर्शक करण्यासाठी काम करण्याची पुरेशी जाणीव असायला हवी. कितीही त्रुटी असल्या तरी, त्या सुधारण्यासाठी आपण काम केले पाहिजे. निसर्ग अधिकारी एक एथिकल हॅकर आहे. त्याने मला एका ग्रुप चॅटवर पोर्टलमधील त्रुटीबद्दल सांगितले. मी त्याबद्दल शोध घेतला आणि मला आढळले की हे सर्व मूल्यांकनासाठी काम करणाऱ्या ऑनमार्क नावाच्या एडटेक सोल्युशन्स कंपनीने तयार केले होते. मी याचा अधिक तपास केला. निसर्गने मला ऑनमार्क वापरणाऱ्या इतर विद्यापीठांची माहितीसुद्धा पाठवली. तिथेही मला त्रुटी आढळल्या. त्यानंतर मला आश्चर्य वाटले की सीबीएसई इतक्या त्रुटी असलेल्या कंपनीचा वापर का करत आहे, असा प्रश्न सार्थकने उपस्थित केला आहे.

मला वाटतं की हे लोक आपलं काम जबाबदारीने करत नाहीत. निविदा तीन वेळा बदलली गेली. नियम बदलले गेले आणि त्यानंतर कॉम्पॅक्ट एड्युटेकला कंत्राट देण्यात आले. अनियमितता उघडकीस आल्यावरही कोणतीही चौकशी झाली नाही आणि नियम वारंवार बदलले गेले. असे असू शकते की ते त्या कंपनीला प्राधान्य देतात किंवा त्यांना आपल्या सतरा लाख विद्यार्थ्यांच्या भविष्याची काळजी नाही, असे सार्थकचे म्हणणे आहे. मला वाटतं की देशाची शिक्षण व्यवस्था विद्यार्थ्यांमधील जिज्ञासा मारत आहे. माझे आई-वडील दोघेही कॉम्प्युटर इंजिनिअर होते. मी सीबीएसईच्या सर्व ५७६ निविदा शोधल्या. मी जीईएम पोर्टलवरही शोधले. पण, तिथे काहीच सापडले नाही. त्यानंतर मी गुगलवरून माहिती गोळा केली. कॉम्पॅक्टला निविदा देण्यापूर्वी, ती दोनदा रद्द करण्यात आली होती. ओएसएम प्रणाली सुरू होण्याच्या केवळ ७४ दिवस आधी ही निविदा त्या कंपनीला देण्यात आली होती, असेही सार्थकने राहुल गांधींशी बोल

## मुंबई विमानतळावर पाच कोटीचे सोने जप्त

**तस्करात भाजप पदाधिकारी - राऊत**

मुंबई विमानतळावर पाच कोटीहून अधिक किंमतीचे सोने व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी भाजप पदाधिकाऱ्याला मुंबई विमानतळावर अटक करण्यात आली आहे. भाजप पदाधिकारी अजित आचरेकर नावाच्या व्यक्तीसह काहींना अटक करण्यात आली आहे. आचरेकर भाजप कामगार संघटनेचा चिटणीस असल्याची माहिती असून काही महिन्यांपूर्वी भाजप महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत त्याचा भाजपमध्ये प्रवेश झाला होता. पक्षाकडून कामगार संघटनेत महत्त्वाची जबाबदारी देण्यात आल्याचा दावा करत शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी भाजपवर गंभीर आरोप केले आहे.

## शहीद शिरीषकुमारच्या जन्मशताब्दीचा प्रशासनाला विसर

जयंती आहे. आगामी काळात नगर पालिका, जिल्हा परिषद आणि सर्व खाजगी शाळांमध्ये हुतात्मा शिरीषकुमार मेहता यांचे कार्य पोहोचण्यासाठी कुठल्याही निधी शिवाय मंडळामार्फत प्रयतक सुरु आहेत. मात्र जिल्हा नियोजन मंडळ आणि प्रशासना कडून विशेष बाब म्हणून जन्मशताब्दी वर्ष उपक्रमासाठी निधीची तरतूद करण्यात यावी. वर्षभरात शासकीय स्तरावर शिरीषकुमार मेहता जयंती जन्मशताब्दी वर्षानिमित्त प्रबोधनपर उपक्रम होणे आवश्यक आहे. पालकमंत्री म्हणून याबाबत सकारात्मक विचार करून नंदुरबार जिल्हा प्रशासनास तातडीने आदेश पारित करावेत असेही शहिद शिरीष कुमार मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष महादू हिरणवाळे यांनी निवेदनात म्हटले आहे.

**हुतात्मा उद्यान बंद अवस्थेत**

शहरातील जेपीएन हॉस्पिटल समोर हुतात्मा शिरीषकुमार उद्यान आहे. मात्र हे उद्यान देखील अनेक वर्षापासून धुळखात अवस्थेत बंद पडले आहे. तसेच माणिक चौकातील हुतात्मा स्मारक देखील अतिक्रमणाच्या विळख्यात आहे. या ठिकाणी वाहनांची गर्दी आणि अस्वच्छतेमुळे हुतात्मा स्मारकाचे पावित्र्य धोक्यात आले आहे. याकडे नंदुरबार नगर पालिकेचे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. किमान शिरीषकुमार मेहता जन्म शताब्दी वर्षात तरी हुतात्मा उद्यान सुरू व्हावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## अश्लील हावभाव करणाऱ्यावर गुन्हा

संशयित संतोष दामोदर संबंधित महिलेकडे पाहून अश्लील कृत्य केले. त्याबाबत विचारणा केल्यावर अन्य संशयितांनी शिवीगाळ करून मारहाण केली, ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी शहर पोलिसांनी महिलांची सुरुवातीला दखल घेतली नाही. संतप्त महिला, नागरिकांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेतली. व्हिडिओची पाहणी केल्यानंतर तात्काळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश पोलीस अधीक्षकांनी दिले. त्यानंतर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

**पान १ वरुन**

## धुळ्यातील तीन उद्योनमुख क्रिकेटपटूंची निवड

असोसिएशनचा क्रिकेटपटू असून देवेन वाघ व सोहम चौधरी हे धुळे येथील एस.व्ही.के.एम. क्रिकेट क्लबचे क्रिकेटपटू आहेत.

या क्रिकेटपटूंना धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे मुख्य प्रशिक्षक फिरोज शेख, सहाय्यक प्रशिक्षक आनंद जगताप, कु. निकिता मोरे तसेच शिरपूर तालुका क्रिकेट असोसिएशनचे प्रशिक्षक संदिप देशमुख व धुळे येथील एस.व्ही.के.एम. क्रिकेट क्लबचे प्रशिक्षक देविदास मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. अंतिम निवड चाचणी व सामने दि. ८ जून पासून पुणे येथे होणार असून यासाठी आज रात्री तिन्ही क्रिकेटपटू पुणे येथे रवाना झाले आहेत. एकाच वयोगटासाठी संभाव्य महाराष्ट्र संघात जिल्ह्यातील तिघांची प्रथमच निवड झाली असल्याने जिल्ह्यातील क्रिकेट प्रेमी व ज्येष्ठ क्रिकेटपटूंनी समाधान व्यक्त केले आहे. संभाव्य महाराष्ट्र संघात निवड झाल्याने तिन्ही क्रिकेटपटूंना धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल व सल्लागार तथा माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

शतावरी, अंजन, कुसुम, बेहडा, करंज, सादडा, पापडी, बाभूळ, बेल, खैर, मोहगणी, महारुख यांसह स्थानिक वनवृक्षांच्या बियाण्यांचा समावेश होता.श्री. तांबोळी यांनी बियाण्यांची प्रतवारी, प्रत्येक बियाण्याचे वैशिष्ट्य, त्यापासून उगवणाऱ्या वृक्षांचे पर्यावरणीय व औषधी महत्त्व, वन्यजीवांसाठीची उपयुक्तता आणि वृक्षसंवर्धनाची गरज याविषयी सविस्तर व अभ्यासपूर्ण माहिती दिली.कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व आणि वृक्षांचे मानवी जीवनातील अमूल्य योगदान यावर मार्गदर्शन करण्यात आले. एक पेड़ माँ के नाम या संकल्पनेचा सन्मान करत परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच, उपस्थित सर्व नागरिकांनी आणि विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षणाची सामूहिक शपथ घेतली.सदर कार्यक्रम सामाजिक वनीकरण नंदुरबारचे विभागीय वनाधिकारी डॉ. मकरंद गुजर आणि सहाय्यक वनसंरक्षक श्रीमती अपर्णा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वनक्षेत्रपाल ईश्वर चव्हाण, वनपाल सुजितकुमार बेडसे तसेच वनरक्षक सिद्धार्थ बैसाणे, भूपेश तांबोळी, सौ. दिपाली पाटील व सौ. गंगोत्री गवळे यांनी विशेष परिश्रम घेतले.ग्रामस्थांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## युवासेनाप्रमुख पाटलांच्या मार्गदर्शनात वकृत्व स्पर्धा

राजकारण व समाजकारण या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले .यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख पंडित माळी, जिल्हा सचिव दिनेश सोनवणे,तालुकाप्रमुख रमेश पाटील युवा सेना उपजिल्हाप्रमुख दिनेश भोपे व्यापारी असोसिएशन जिल्हाध्यक्ष बापू महाजन अल्पसंख्यांक आघाडी प्रमुख इम्तियाज पटेल युवा सेना जिल्हा सचिव अक्षय श्रीखंडे, युवा सेना शहर प्रमुख एजाज काझी शहर प्रमुख शहर शेखर जाधव शिवसेना कार्याध्यक्ष मन्नान गणी युवा सेना सोशल मीडिया आयन खाटीक राज पाटील वाहतूक सेना प्रमुख कुणाल पवार रोहित मराठे युवा सेना उपशहर प्रमुख आधी शिवसैनिक व मान्यवर उपस्थित होतेएजाज काझी शहर प्रमुख शहर शेखर जाधव शिवसेना कार्याध्यक्ष मन्नान गणी युवा सेना सोशल मीडिया आयन खाटीक राज पाटील वाहतूक सेना प्रमुख कुणाल पवार रोहित मराठे युवा सेना उपशहर प्रमुख यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विवाह नोंदणी सेवा ऑनलाईन सुरु

उपस्थित राहिल्यानंतर सर्व माहिती योग्य आढळल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. विवाह नोंदणीसंदर्भात अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त किशोर वाघ (मो. ९४२२३३३७१९) किंवा सिस्टीम मॅनेजर बासित पठाण (मो.९४२२२९६२१६ ) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन महानगरपालिकेने केले आहे. धुळे महानगरपालिका नागरिकांना अधिकाधिक डिजिटल सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयतक्शील असून विवाह नोंदणी सेवा ऑनलाईन झाल्यामुळे नागरिकांचा वेळ, श्रम आणि खर्च वाचण्यास मोठी मदत होणार असल्याचे आयुक्त श्री नितीन कापडणीस यांनी कळवलेले आहे

## गणोरला जागतिक पर्यावरण दिन साजरा

शकतो असे सद्गुरु फाउंडेशनचे सतीश रावताळे सर यांनी सांगितले, सीआरपी कविता भामरे यांनी प्रत्येकाने झाड लावून ते जगवलच पाहिजे असे सांगितले. विशाल ब्राह्मणे राहुल रावताळे, अनिता भामरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.प्रतीक्षा मॅडम यांनी सीड बॉल म्हणजे बिया, चिकणमाती, आणि सेंद्रिय खत (कंपोस्ट) यांच्या मिश्रणापासून बनवलेले छोटे गोळे, हे गोळे म्हणजे वृक्षारोपणाचा एक स्वस्त, सोपा आणि प्रभावी मार्ग या बद्दल मार्गदर्शन करून प्रात्यक्षिक करुन दाखविले. कार्यक्रमात सरपंच शितल रावताळे, सुमित निकुंम, ग्रामसेवक रतिलाल वळवी, लक्ष्मण निकूम, जागृती महिला शेतकरी गटाच्या महिला व पुरुष उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एन एम सद्गुरु फाउंडेशन चे योगेश कदम, सीआरपी रविंद्र पावरा, अनिल रावताळे, रवींद्र पटले, निलेश चव्हाण यांनी मेहनत घेतली. सूत्रसंचालन रवींद्र पावरा यांनी केले.

## चितोडरोड परिसरात दांपत्याची लुटमार

गळ्यातील १० तोळ्याची सोन्याची चैन, महिलेच्या गळ्यातील मनिमंगळ सुत्र काढुन घेतले. याप्रकरणी संशयित राहुल मनोहर कदम (रा. रासकर नगर), आकाश मनोहर कदम (रा. शिवशकती कॉलनी), मलींदर सिकलकर (रा.साक्री) यांच्याविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला सहाय्यक निरीक्षक पी. पी. मोहिते तपास करीत आहेत.

## वणी येथील तिघांवर चाकूने जीवघेणा हल्ला

योगेश विजय वाघ, राकेश विजय पाटील, भट्ट भिवसन कोळपे यांना दुखापत झाली. योगेश वाघ याने दिलेल्या फिर्यादीनुसार संशयित सोपान सोमनाथ पाटील, राहुल शांतीलाल पाटील (दोघे रा. वणी), अभिजित उर्फ बोंग्या भरत राजपूत (रा. मळाणे) यांच्याविरुद्ध धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलीस उपनिरीक्षक प्रशांत राठोड तपास करीत आहेत.

## शिंदखेडा ग्राहक पंचायत शुक्रवारी प्रबोधन शिबिर

धुळे, दि.७ - ग्राहक पंचायत महाराष्ट्र धुळे शाखेच्या वतीने १२ जून २०२६ **ला सकाळी ९ते दुपारी ४ या दरम्यान धुळे येथील जैन भवनात कार्यकर्त्यांचा ग्राहक प्रबोधन शिबिर आयोजित केले असल्याची माहिती संघटनेचे धुळे जिल्हा संघटक चंद्रकांत डागा यांनी दिली.**

या शिबिरात धुळे,जळगांव व नंदुरबार जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. शिबिराच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे राज्य अध्यक्ष डॉ.विजय लाड असून स्वागताध्यक्ष जिल्हाध्यक्ष ड.जे.टी.देसले राहतील.प्रमुख अतिथी म्हणून राज्य सचिव अरुण वाघमारे, नाशिक विभाग अध्यक्ष डॉ.अजय सोनवणे, ग्राहक तक्रार निवारण आयोग अध्यक्ष नीता देसाई,जिल्हा पुरवठा अधिकारी संजय बागडे, जिल्हा कृषी अधीक्षक सुरज जगताप राहणार आहेत.

शिबिरात अरुण वाघमारे संवाद समन्वयातून ग्राहक कल्याणम, बी एम भामरे शेतकरी ग्राहक, ॲड. सुरेंद्र सोनवणे माहितीचा अधिकार, ॲड. चंद्रकांत येशिराव विज कायदा व वीज ग्राहक, ॲड चैतन्य भंडारी सायबर कायदा, सीए राजाराम कुलकर्णी आयकर कायदा, राजाराम शिंपी एमआरपी, मोहनदास भामरे खरंच काम होतंय काय?, प्रा. राजाराम राणे ग्राहकांचे हक्क व कर्तव्ये इत्यादी विषयांवर तज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. तसेच ज्या ग्राहकांना ग्राहक पंचायत मार्फत न्याय मिळाला आहे, त्यांचे अनुभव कथन व वक्त्यांच्या वक्तव्यावर आधारित प्रश्न मंजुषा कार्यक्रम होऊन योग्य उत्तर देणाऱ्या तीन कार्यकर्त्यांना बक्षिस दिले जाणार आहे.

तिन्ही जिल्हे मिळून १००च्यावर कार्यकर्ते उपस्थित राहणार असून त्या सर्वांना उपस्थिती प्रमाण पत्र मिळणार असल्याचे प्रा.डागा यांनी सांगितले.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

## पवन नगरामधील दहा लाखांच्या कॉंक्रीट रस्त्याच्या कामाला सुरुवात

**धुळे, दि.७ - शहरातील चाळीसगाव रोड परिसरातील प्रभाग क्रमांक १६ मधील पवन नगर भागात आमदार निधीतून मंजूर झालेल्या दहा लाख रुपये खर्चाच्या कॉंक्रीट रस्त्याच्या कामाचा शुभारंभ नगरसेवक धीरज भैय्या परदेशी यांच्या हस्ते करण्यात आला.**

पवन नगर परिसरात संजय पाटील यांच्या घरापासून ते लक्ष्मण येलपले यांच्या घरापर्यंत रस्ता नसल्याने नागरिकांना विशेषत: पावसाळ्यात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. याबाबत स्थानिक नागरिकांनी नगरसेवक धीरज परदेशी यांच्याकडे वारंवार मागणी केली होती.

नागरिकांची समस्या लक्षात घेऊन नगरसेवक धीरज परदेशी यांनी धुळे शहराचे आमदार अनुप अग्रवाल यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यानुसार आमदार अग्रवाल यांनी आमदार निधीतून १० लाख रुपये मंजूर करून या रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणासाठी निधी उपलब्ध करून दिला. या कामाच्या शुभारंभप्रसंगी रेखाबाई येलपले, रूपाली लोंढे, इंदुबाई केदार, मायाबाई शेवतकर, मंगलाबाई देवरे, पूजा खैरनार, वैशाली अहिरे, लक्ष्मण येलपले, संजय पाटील, रोहन मंगीडकर, अमोल पाटील, दिलीप लोंढे, विशाल मिस्त्री यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या परिसरात कच्या स्वरूपाचा रस्ता असल्यामुळे पावसाळ्यात नागरिकांना समस्या जाणवत होत्या. त्यामुळे रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणाची मागणी होती. या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर परिसरातील नागरिकांना वर्षानुवर्षे भेडसावणाऱ्या वाहतुकीच्या व



पावसाळ्यातील समस्यांपासून मोठा दिलासा मिळणार असल्याची भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.


**पत्रकार बांधव**

धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघ(आपला महाराष्ट्र) धुळे सभासद नोंदणी सुरु असून दि.६ जुन ते १३ जुन २०२६ पर्यंत संघाचे सदस्याचे फार्म भरुन देणे आहे. त्यासाठी फार्म फी.१० रु व सदस्य फी रु.५० असे एकूण साठ रु भरावयाचे आहेत. तरी सर्व सदस्यांनी मुदतीत फार्म भरुन सहकार्य करावे. कळावे

वेळ – सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत

डी.बी.पाटील, सरचिटणीस — यशवंत हरणे, अध्यक्ष

धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघ

**हॉस्पिटलसाठी भाड्याने देणे आहे**

प्रकाश टॉकीज परिसर, प्लॉट नं.२४, बडगुजर प्लॉट येथे डॉ.सुभाष भामरे यांच्या शेजारी ८० फुटी रोडलगत सुमारे १५०० चौ. फूट तळमजल्यावरील प्रशस्त जागा भाड्याने देणे आहे. हॉस्पिटल, क्लिनिक, योग्य पार्किंग व २४ तास पाणी सुविधा.

7507824059 7776050787

**पाहिजेत**

मेहेरगांव –शिरडाणे येथे शेतात राहण्यासाठी फॅमिली पाहिजे. सर्व सोयींसह

: संपर्क : 9422287548

**पाहिजेत**

हॅण्डलुम दुकानात कामासाठी लेडीज/जेण्टस सेल्समन पाहिजेत, तसेच लेडीज कॉम्प्युटर ऑपरेटर लावणे आहे. समक्ष भेटा.

अजिंक्य हॅण्डलुम, ग. नं. ८ जिनगर गल्ली, धुळे

**पाहिजेत**

दुकान कामासाठी कामाची गरज असलेली मुले पाहिजेत.

– संपर्क –

प्रियंका स्पोर्टस ॲण्ड सायंटीफीक, ७, प्रबोधनकार व्यापारी संकुल, धुळे

**पाहिजेत**

MIDC येथे Accountant सुपरवाईजर होतकरु कामगार पाहिजेत.

9130397130

**पाहिजेत**

सिलेंडर वाटप कामासाठी हुषार, होतकरु मुलगा/माणूस पाहिजेत. (अॅपेरिक्षा येणे आवश्यक)

तिरुपती गॅस एजन्सी, गल्ली नं.२, पुर्ती बिल्डींग जवळ, धुळे

8554982900 7875556589

**पाहिजेत**

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (BPCL) पंपावर डिझेल/पेट्रोल/गॅस भरण्यासाठी अनुभवी मुले पाहिजेत

पगार : १० – १५ हजार + बोनस+विमा

: समक्ष भेटा : 9225640005

**वीर सावरकर जयंती निमित्त शुभारंभ**

**वीर सावरकर अपार्टमेंट**

फ्लॅट बुकिंग व भाड्याने देणे आहे.

फ्लॅट एरिया :- 1 BHK - 1000 स्के.फुट, 2 BHK - 1200 स्के.फुट, 3 BHK - 1350 स्के.फुट

बुकिंगसाठी संपर्क

मालक तात्यासाहेब रघुनाथ भगवान चौधरी मो. 9405466937

इंजि.राजेंद्र के.खैरनार (बी.ई.सिव्हिल) मो. 9422789513

पत्ता : वाणी मंगल कार्यालयाजवळ, भिडेबाग देवपूर, धुळे

**पाहिजे**

१) फार्मासिस्ट
२) कॉम्प्युटर ऑपरेटर

अनुभव आवश्यक

8208879381 9423495381

**प्लॉट विकणे आहेत**

आर्वी NH-3 हायवेलगत केले नगर येथील गट नं.२२८ या ले-आऊट मधील प्लॉट विकणे आहे.

आर्वी NH-3 हायवेलगत श्रीकृष्ण नगर येथील गट नं.२३२ या ले-आऊट मधील प्लॉट विकणे आहे.

आर्वी NH-3 हायवेलगत भगवती विहार येथील गट नं.२६५/३/१ या ले-आऊट मधील प्लॉट विकणे आहे.

संपर्क – 9422792677, 8888192677

**पेवर ब्लॉक**

उच्च दर्जाचे पेवर ब्लॉक मिळतील. शांती सिमेंट प्रॉडक्टस, डी.६५, एमआयडीसी, अवधान, धुळे

– संपर्क – 9422289550

कुलिंग इंडिया की पहचान

Symphony | Crompton

आत्ता पर्यंतच्या कुलर्सच्या तुलनेत सर्वात स्टायलिश मॉडेल्स्'





आता खरेदी करा कूलर 0% EMI वर

BAJAJ FINSERV 0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.

नियम व अटी लागू*

ak media- 238222

58 वर्षापासून आपल्या सेवेत...

अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही

श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

**पाहिजेत**

- नर्स (ANM GNM)
- R.M.O
- रिसेप्शनिस्ट
- B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट

संपर्क

यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय, दत्त मंदीर देवपूर, धुळे मो. ८३२९२४९३८६

**पाहिजेत**

Thancos Natural Icecream

Part Time/ Full Time

कॅफे, आईस्क्रीम पार्लरमध्ये कामाचा अनुभव आवश्यक

बेसिक कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक

पत्ता : जयहिंद कॉलेज रोड, देवपूर, धुळे

इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा : 9270492404


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०